# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ४३ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : २५/०२/२०२१**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.२५/०२/२०२१ गुरूवार रोजी सकाळी ११.३० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती पाटील राजेंद्र झिपरू यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. पाटील राजेंद्र झिपरू सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | पाटील कुलभुषण विरभान |
| सोनवणे मुकुंदा भागवत | लढढा नितीन बालमुकुंद |
| देशमुख प्रतिभा गजानन | बरडे नितीन मनोहर |
| चव्हाण ज्योती बाळासाहेब | नाईक प्रशांत सुरेश |
| बेंडाळे उज्वला मोहन | शेख सैईदा युसुफ |
| बाविस्कर किशोर रमेश | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, मा.अतिरिक्त आयुक्त, डॉ.विद्या गायकवाड, नगरसचिव,श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त, शाम गोसावी, उपायुक्त,प्रशांत पाटील, मुख्यलेखा परिक्षक, श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी, श्री.कपिल पवार, व सहा.आयुक्त. श्री.पवन पाटील उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेला सुरुवात करण्यात आली.**

**मा.सभापती :-** मा.आयुक्त सो। यांनी सन २०२०-२१ चे सुधारीत अंदाजपत्रकासह सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रक सर्व सन्मा.स्थायी समिती सदस्यांना त्याची प्रत देण्यात आलेली आहे.साहेबांनी त्यांच्या मनोगतात त्यांचे जे विषय होते त्याबद्दल त्यांनी माहिती दिलेली आहे आणि ढोबळ मनाने सर्व सदस्यांचा आज जरी अभ्यास झाला असेल तरी सखोल अभ्यास करण्यासाठी सर्व सदस्यांना या अंदाजपत्रकाचा सखोल अभ्यास व्हावा म्हणुन आजची ही सभा आपण तहकुब करत आहोत आणि पुढील सभेची आपल्या सर्वांना तारीख कळविण्यात येईल. यानंतर नगरसचिव यांनी नियमित स्थायी समिती सभा क्रं. ४३ मधील विषयांना सुरूवात करावी व सभेच्या शेवटी राष्ट्रगीत घ्यावे.

**नगरसचिव :-** सभापती महोदय यांच्य निर्देशानुसार स्थायी समिती सभा क्रं. ४३ वरील विषय पत्रिकेमधील विषयांना सुरूवात करण्यात येत आहे.

**नगरसचिव :- विषय क्र. १:-** दि.०२/०२/२०२१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सदर विषयास मान्यता आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३१५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.०२/०२/२०२१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १२ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्र. २:-** शहरातील डांबरी रस्ते दुरुस्ती बाबत सन २०१९-२० या आर्थीक वर्षात झालेल्या कामांची सन्मा.नगरसेवक श्री.नितीन बरडे यांचे दि.२५/०८/२०२० चे पत्रान्वये कामांची चौकशी बाबत प्रशासनाकडुन आलेल्या चौकशी अहवालाची माहिती घेणे.

**श्री.नितीन बरडे :-** चौकशी अहवाल याठिकाणी आलेला आहे.खुप लवकर आलेला आहे हा चौकशी अहवाल कारण की या मध्ये काही शब्द आहेत , तत्कालीन शहर अभियंता आणि तत्कालीन आयुक्त साहेब माझ्यामते तुम्ही पण होतात. हा अहवाल ज्या दिवशी झाला आहे त्याच दिवशी मला माहिती पडले होते.मला माहिती होती की अहवाल काय येणार आहे आणि त्याच्या पहिले हा अहवाल सादर होण्याच्या पहिले मी तत्कालीन आयुक्त साहेब आणि तत्कालीन शहर अभियंता यांना म्हणजे आमचे याच्यात १२ प्रभाग आहे . त्या १२ प्रभागामध्ये तिन युनिट येतात जो संबंधित इंजिनियर आहे. त्यांनी केलेल्या बिलाची मागणी मी केलेली होती. ते आजपर्यंत मला मिळालेले नाहीये.यांनी एम.बी मध्ये नोंद काय केलेली आहे काय नाही सर्व खर्च झेरॉक्सचा मी करणार होतो . माझे पत्र तुमच्या कडे असतील. आज पर्यंत मी मागणी केलेली बिल सादर झालेली नाहीत आणि ज्या वेळेस हे अर्ज दिले माझी संबंधित मक्तेदार , ठेकेदार किंवा संबंधित कामगार यांच्यावर रोष नाहीये साहेब माझ ा रोष आहे इंजिनियरांवर आजही सांगतो तुम्हाला माझ्या प्रभागातील चर्च पासुन सुरेश नगरपर्यंत जाणारा रस्ता अर्धाच झालेला आहे. मायादेवी ते रोटरी भवन पर्यंत जाणारा रस्ता हा झाला नाही.चर्च रोड ते गोदावरी चक्की पर्यंतचा रस्ता हा झाला नाही . हा कसा झाला जेव्हा ही कागदपत्रे चालु केले तेव्हा शहर अभियंता यांनी काय केले त्यावेळेस कुठलातरी एक मक्तेदार आहे त्याला आणले त्याला काहीतरी समजुत घातली आणि तो रस्ता दुरूस्त करून दिला म्हणजे दुसरीकडे कुठेतरी काम कमी केले आणि तो रस्ता करून दिला आहे. माझी तुम्हाला एवढीच विनंती आहे. त्या इंजिनियरला मी जेव्हा बिलं मागीतले तेव्हा बिल मला सादर झालेले नाही म्हणजे खर्च मी देणार होतो झेरॉक्सचा पण हे सर्व प्रकरण लपवण्यासाठी सविस्तर पणे त्या इंजिनियरची त्याठिकाणाहुन बदली करून टाकली. मी नाही सांगत होतो की त्यांची बदली करू नका माझे आणि त्यांचे काही वाईटपणा नाहीये . फक्त ही चौकशी होईस्तव त्यांना तिथेच ठेवा. मग बदली का केली. आता हा जो चौकशी अहवाल तुम्ही दिलेला आहे. त्यात म्हंटलेले आहे तत्कालीन शहर अभियंता आणि तत्कालीन आयुक्त हे कामाच्या पाहणीसाठी गेले होते. आजपर्यंत एकही आयुक्त साहेब पाहणीला आलेले नाहीये. काम सुरू असतांना एकही आयुक्त किंवा शहर अभियंता हे पाहणीला आलेले नाही. साहेब मला एक सांगा काम चालु असतांना तुम्ही गेले आहे का? मागच्या दोन महिन्यात माझ्या वॉर्डात एक कॉक्रींट रस्ता झाला शासकीय निधी मधुन शहर अभियंता यांना फोन लावला संबंधित इंजिनियर हा आजारी होता . काम संपुन गेले पण संबंधित इंजिनियर जागेवर नाहीत आजारी असल्यामुळे ज्यांना चार्ज दिला होता ते आले नाहीत शहर अभियंता आले ते पण काम झाल्यानंतर आले त्यांना सांगीतले होते आयुक्तांना पण घेवुन या.तुमच्या ज्ञानाची आम्हाला भर पडु द्या काही कमतरता असली तर आम्हाला सांगा तुम्ही विचारुन घ्या शहर अभियंत्यांना तर या अहवालाचे पुढे काय आहे साहेब हा अहवाल सविस्तर पणे बिल द्यायचे आहे तुम्ही बिलं देवुन द्या . ठेकेदाराचे बिल तुम्ही थांबवु नका माझा संबंध आहे फक्त इंजिनियर लोकांशी संबंधित इंजिनियर काम करून घेत नाही त्याच्यावर माझा रोष आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** भाऊ हा जो विषय आहे ना साहेब तुम्हाला आठवत असेल सन्मा . नितीनभाऊंनी याबाबतची तक्रार केलेली होती. त्यावेळेस मी यासंदर्भात तुम्हाला भेटायला आलो होतो आणि भाऊ त्याठिकाणी यांनी चौकशी केली तेव्हा साहेब स्वत: होते कारण की हे काम होते साहेब तुम्ही स्वत: आले होते साहेब तुम्ही पाहणी केली संबंधित इंजिनियर होते. सिटी इंजिनियर भोसले साहेब होते.

**श्री.नितीन बरडे :-** तुमच्या वॉर्डात आले असतील, माझे काम जे घेतलेले होते त्या कामांवर तुम्ही पाहणी केली का?

**श्री.कुलभुषण पाटील :-** त्या ठिकाणी तुम्ही संबंधित विषयाची पाहणी केली. संबंधित ठेकेदाराने तेथे काम केलेले होते आणि संबंधित ठेकेदाराचे जे बिलं थांबविलेले होते . संबंधित सदस्यांच्या तक्रारीवरून आपण ते बिलं थांबविलेले होते .त्यावेळेस साहेब समजा एखादी ठेकेदार किंवा एखादा इंजिनियर किंवा एखादी कर्मचारी चुकीचा असेल तर मग जो चांगले प्राम्प्ट जो ठेकेदार चांगल्या पध्दतीचे काम करत असेल. तुम्ही त्या विषयाची माहिती घेतल्यानंतर जर काम झालेले असेल तर साहेब माझी विनंती आहे की साहेब ठेकेदाराला देयके देण्यासाठी थांबवु नये. कारण की साहेब आपण जर अशी पध्दत ठेवली तर साहेब माझे म्हणणे एकदम चुकीचे आहे असे समजा जर तसे चुकीचे आहे तर साहेब त्याला शिक्षा झालीच पाहीजे. साहेब जो ठेकेदार वेळेत काम पुर्ण करतो. चांगल्या पध्दतीचे काम करतो तर त्याचे देयके थांबले नको पाहीजे. साहेब आपल्या महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये आपली जळगांव महानगरपालिका महाराष्ट्रामध्ये ठेकेदारांच्या डोक्यामध्ये हे आहे की त्यांच्या की आपल्या महानगरपालिकेचे काम केल्यानंतर ते बिलच नाही देत. तर मी सांगतो साहेब कुणीचं

ठेकेदार काम करायला येत नाही साहेब कारण ही जी पध्दत आहे ना साहेब अत्यंत चुकीचे आहे साहेब परंतू जो चांगल्या पध्दतीचे काम करतो ज्याने पुर्ण वेळेत काम केले आहे.त्याची बिल ही दिली गेली पाहीजे. नितीनभाऊंनी जी तक्रार केली की एखाद्या प्रभागापुरता असेल किंवा एखाद्या रोडापुरता असेल. परंतू साहेब आपण काय केलेले आहे की सगळयाच ठेकेदारांचे बिलं थांबवुन घेतलेले आहे तर साहेब मला एकच सांगायचे आहे की असे करू नये.

**श्री.नितीन बरडे :-** भाऊ माझा बिलांचा काही विषय नाही . संबंधित इंजिनियर यांनी ईस्टिमेट मध्ये जे काही काम घेतलेले होते ते काम त्यांनी करून घेतले की नाही त्याच्यावर माझा विषय आहे मी बिलांच्या विषयी मागे पण बोललो होतो बिलांच्या प्रती आजपर्यंत माझ्यापर्यंत पोहोचलेल्या नाहीत.दोघी शहर अभियंता रिटायर्ड झाले. खडके साहेब , भोळे साहेब त्यांनी सविस्तरपणे, सोईस्करपणे तिथुन इंजिनियरची बदली करून टाकली. मला त्या बिलांना थांबवण्याचा काहीच रोष नाहीये. मला फक्त अभियंत्यांवर रोष आहे.त्यांनी काय काम करून घेतले आहेत . ठेकेदाराचे हे बिलं तुम्ही द्या तुम्ही नको द्या त्याच्याशी माझे काही घेणे देणे नाही.

**मा.आयुक्त :-** या बाबत आपली स्थायी समितीमध्ये चर्चा झाली होती.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब बिल बाकीचे आहेत.

**मा.आयुक्त :-** बरोबर आहे, कामाच्या संदर्भामध्ये सन्मा.सदस्यांनी जो काही अर्ज दिला होता आणि स्थायी समितीमध्येही मांडले होते तर तो प्रमुख जो मसुदा होता म्हणजे जे काम झालेले नाही परंतू संबंधित इंजिनियरने रेकॉर्ड केले आहे एम.बी मध्ये त्याने हा एक महत्वाचा मुद्दा म्हणजे काम न होता बिलं तयार करणे दुसरी गोष्ट यापुर्वी जी कामं झालेली आहेत त्याच ऑडीट झालेले नाही अशा प्रकारची आपली ती तक्रार होती म्हणजेच काम न होताच बिले दिली गेलेली आहेत.या दोन तक्रारींच्या अनुषंगाने आपण त्यावेळेला ज्या कालावधीमध्ये हे काम झालेले होते. त्यावेळेला आपले भोळे सिटी इंजिनियर होते ते रिटायर्ड झाल्यानंतरचे जे सिटी इंजिनियर होते खडके त्यावेळेला आपण इंटरनल ऑडीटर आहेत या दोघांची संयुक्त समिती आपण नेमलेली होती. या समितीने याच्याबद्दलची झालेली कागदपत्रे, बिलं, एम.बी , संबंधित इंजिनियरचे जाब जबाब नोंदवुन त्यांचे रेकॉर्ड करून तो अहवाल आपल्यासमोर ठेवलेला आहे.आता या बाबतीमध्ये जो काही निष्कर्ष त्यांनी काढलेला आहे तो आताचे जे प्रभारी शहर अभियंता आहेत ते आणि मुख्यलेखापरिक्षक या दोघांनी कागदपत्र आणि संबंधित इंजिनियरचे जबाब हे विचारात घेवुन याबाबत तो अहवाल सादर केलेला आहे.आता दुसरा जो मुद्दा आहे जो की आपण म्हणताहेत की आपल्याला बिलांची माहिती आपल्याला मिळाली नाहीत . तर आता आपल्याकडे जे बिलांची कॉपी पाहीजे असेल किंवा एम.बी ची कॉपी पाहीजे असेल ताबडतोब देण्यात येतील . मी संबंधित अधिकाऱ्याला सुचना करतो पुढच्या चार पाच दिवसांमध्ये सन्मा .सदस्य जी काही मागणी करताहेत ती देण्याची व्यवस्था करावी. याच्यामध्ये कुठल्याही प्रकारची माहिती झाकुन ठेवण्याचं काही कारण नाहीये. कामकाज अगदी पारदर्शक असले पाहीजे.सन्मा.सदस्यांचा माहिती घेण्याचा तो अधिकार आहे त्याच्यापासुन आपल्याला त्यांना वंचित करता येणार नाही.दुसरी गोष्ट कुलभुषण भाऊंनी जो मुद्दा मांडला होता बिलांच्या संदर्भामध्ये त्यावेळेच्या स्थायी समिती मध्ये ही चर्चा झाली होती. जसे मी आता म्हटले तसे की काम न करता बिलं दिली गेलेली आहे किंवा आता जी बिलं आलेली आहेत त्याच ऑडीट झालेले नाही . अशा प्रकारचे गंभीर मुद्दे एका ज्येष्ठ सदस्यांनी त्यावेळी स्थायी समितीमध्ये मांडले होते.स्थायी समितीमध्ये असे ठरले होते की आपण त्याची चौकशी करूया . आता एखाद्या वेळेला सन्मा.सदस्य गंभीर स्वरूपाचे मुद्दे उपस्थित करतात आणि आपण सर्वजण त्याची चौकशी करायचा निर्णय घेतो . अशावेळेला आपण एका बाजुला चौकशी करायची आणि म्हणुन आपण काहीतरी आपल्याला वाटतं की त्या चौकशीमध्ये काहीतरी असाव म्हणुन आपण चौकशी करू ते मत बाजुला चौकशी सुरू असतांना ती बिल देवुन टाकायची आणि म्हणुन मग बिल दिल्यानंतर चौकशीला काही अर्थ राहात नाही. म्हणुन याच्यामध्ये ठेकेदाराला त्रास होईल अशी आपलीही भुमिका नाही व आमचीही नाही. परंतू एक प्रशासकीय प्रक्रीया असते की जोपर्यंत त्या विषयाची तक्रार आपण निकाली काढत नाही किंवा आपण त्याचा निर्णय घेत नाही तोपर्यंत शक्यतो पुढे पाऊल टाकत नाही. आता हे बिल न देणं याचा उद्देश एकच असतो की समिती चा अहवाल येवु द्या आणि स्थायी समितीमध्ये याच्यामध्ये निर्णय घेतल्यानंतर हे काम योग्य झालेले आहे , कार्यपध्दतीला धरून झालेले असेल त्याला आपला काही ईश्यू नाही आणि त्याचे पेमेंट आपण देणार आहोत. परंतू काही वेळ आपल्याला योग्य वेळेपर्यंत या विषयामध्ये थांबणं हे गरजेचं राहातं .या काळामध्ये आपण थांबलो ज्या ज्या वेळेला आपण मिटींग घेतल्या आहेत त्यावेळेला सर्व इंजिनियरांना सुचना देण्यात आलेल्या आहेत की कुठल्याही परिस्थितीमध्ये कामाची क्वालीटी आणि क्वांटींटी च्या बाबती मध्ये कॉम्परमाईजही नको . महानगरपालिकेकडे पर्यायही आहेत अशा इंजिनियर

आहेत . त्यांचा जास्तीत जास्त वापर करावा. क्वालीटी च्या बाबतीमध्ये एम.बी मध्ये आजही मी माझ्याकडे फाईल आली होती आपण ज्या विषयी मांडले आहे त्या संबंधी त्याच्यावर मी स्पेसीफीक आदेश लिहुन पाठवले होते की याच्याबद्दलची कामाची गुणवत्ता आणि केलेल्या कामाची रेकॉर्डींगची खात्री स्वत: शहर अभियंता यांनी केलेली आहे असे स्पष्ट पणे त्याच्यात नमुद करा. याची जबाबदारी आपण कुठेतरी उचलली पाहीजे. केवळ काम झाले आणि आपल्या युनिट इंजिनियरने एम.बी ला रेकॉर्ड नोंद करून सिटी इंजिनियरकडे पाठवणे हे अपेक्षित नाही. १०० टक्के काम झाले आहे किंवा नाही . काम मॅच्युरीटी ने कामावर सुपरविजन तुम्हाला करता आले पाहीजे आणि जे काम आहे त्याच्यामध्ये १०० टक्के इंजिनियरचे सुपरविजन हे झालेच पाहीजे आपल्याला याबाबतीत आपण कुठल्याही क्वालीटी किंवा क्वांटीटी मध्ये कोणतीच कॉम्परमाईज करणार नाही त्याच्याबद्दल सदस्यांनी आश्वस्त राहावे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब तिन महिने झाले आहे टेंडर निघुन खड्डे बुजविण्याचे ते एक नंबर प्रभाग व दोन नंबर प्रभागात जो ठेकेदार काम करतोय आता त्याने कमीत कमी दिड महिन्यापासुन काम बंद करून टाकले आहे.तो म्हणतो डांबर भेटत नाही . खडी रस्त्यावर पडलेली आहे. नंतर त्या चाऱ्या खोदुन ठेवलेल्या आहेत.फेडरेशन पासुन ते सुरेशदादा यांच्या बंगल्यापर्यंत ते काम आहे आता खडी रस्त्यावर पडलेली आहे लोकं रस्त्यावर पडत आहेत आता त्याच्यावर काय कारवाई करणार आहे. मी दोन वेळा साहेब तुम्हालाही बोललो. राजकीय याच्यावरून ठेकेदाराला तुम्ही कामं देतात. हे असे प्रकार होतात हे लोकं काम घेतात आणि मग आम्ही लोकं चौकशीला समोरे जातो . मग आम्ही म्हणतो चौकशी करा असे म्हणतो . ते बिलकुल ऐकत नाही दोन महिन्यांपासुन सांगतोय मी यांना फोन पण उचलत नाहीत.

**मा.आयुक्त :-** बरोबर आहे, ठेकेदाराचे काम कसे चालु आहे काही दिवस चालु आणि काही दिवस बंद असते तर ते बरोबर नाही तर ती एजन्सी सक्षम नसेल तर ते टेंडर रद्द करा आणि ते रिटेंडर करून ते काम दुसऱ्या एजन्सीला देवुन ते काम त्यांच्याकडुन करून घ्या. आता वेळ कमी आहे फेब्रुवारीच्या अखेरीस आपण आलोय. मार्च, एप्रिल, मे दोन ति न महिने राहीलेत. पुन्हा पावसाळ्यात आपल्याला काम करता येणार नाही. अशा वेळेला वेळ कमी आणि कारवाई करण्यात काही अर्थ उरणार नाही. तुम्ही तातडीने हाच प्रभाग नव्हे प्रभाग १ आणि २ या व्यतिरीक्त ज्या ज्या ठिकाणी अशी कामं दिलेली असतील त्या ठिकाणी तुम्ही तातडीने ते काम करून घ्या.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब दुसऱ्या ठेकेदाराकडुन काम करून घ्या. नागरीकांना त्रास होतोय साहेब

**मा.आयुक्त :-** हो बरोबर आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** साधारणत: कार्यादेश देवुन आणि सुरू करून दोन वर्षाचा कालावधी झालेला आहे. आज त्या रस्त्यावर जावुन गटारी बघाल तर त्या गटारींच्या मध्ये पडण्याचा खुप मोठा धोका तिथे आणि एकवेळेस तिथे रिक्षा पलटली होती गॅस सिलेंडर भरलेली. मुख्य रस्त्यावर जर कामावर जर इतका विलंब होत असेल आणि मक्तेदार हा त्या कामासंदर्भात बदलत नसेल तर तश्यावर काय कारवाई करता येईल.

**श्री.अरविंद भोसले , शहर अभियंता :-** मागच्या १५ दिवसांपुर्वी ५ ते ६ ट्रॅक्टर डिपार्टमेंटचे लावले आहेत आणि जेसीबी लावुन तो भराव करून घेतला आहे. त्या रस्त्यापासुन ते नाल्यापर्यंत जो पोर्शन होता त्या गटारी पर्यंतचा तो भरण्यात आला आहे आणि आता खड्डे बुजविण्याचे काम सुरू आहे .

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला एक सांगा की ज्यावेळेला आपण काम देतो. आज कमीत कमी त्या कारणांमुळे त्या मक्तेदाराची सोडवणुक होतेय. त्या तिथे नाल्याजवळ जो भराव होता तो त्यावेळेला ईस्टीमेट मध्ये काऊंट करण्यात आलेला नव्हता. दोन वर्ष नागरीकांना हालपेटचा सुचावा लागला. याला जबाबदार कोण? आपण प्रत्येक वेळा म्हणतो की, याच्यावरच्या जबाबदाऱ्या कोणावर तरी फिक्स व्हायला पाहिजे. अन्यथा मला सांगा, पैसा खर्च होत आहे. मोठया प्रमाणावर त्याच्यावर पैसा खर्च होणार आहे. परंतु ते काम जर मुदतीत पुर्ण होत नसेल. ज्याच्यामुळे नागरीकांचे हाल होत असतील. त्याची जबाबदारी कोणावरती, शेवटी नागरीक या सर्व गोष्टींना लोक प्रतिनिधींना जबाबदार धरत असते. सगळ रोष जे असतो तो स्थानिक लोकप्रतिनिधींवर असतो. कारण त्यांना वाटत की, लोकप्रतिनिधी कुठेतरी या कामांमध्ये कुठेतरी निगळीत असेल.या अनुषंगाने या कामांना कुठेतरी पाठीशी घातले जाते. परंतु या ज्या तांत्रिक अडचणी असतात. ते सामान्य जनतेला कळत नाही.मग या वेळेला मक्तेदारही आपण असतो आणि लोकप्रतिनिधीही असतो. त्यावेळेला आपण अंदाजपत्रक तयार करतो. त्या वेळेला या सर्व गोष्टी विचारात घेतले पाहिजे. अस का होत नाही. साहेब जसा आपण पांझरापोळच्या जवळ अरुण कस्तुरींचा गॅरेज आहे. त्या ठिकाणी मोठी चारी पडलेली आहे. रोड क्रॉसींगवर मोठी चारी पडलेली आहे. आज काय होत शहरामधील एम.आय.डी.सी.कडे जाणारा प्रचंड वाहतुकीचा वेग असतो.

साधारणता खोल चारी तेथे पडलेली आहे. आणि ती चारी जवळपास दोन महिन्यापासुन पडलेली आहे. आणि त्याच्यामुळे ते पांझरापोळ चौकामध्ये वारंवार वाहतुकीची कोंडी होते. कारण जो पर्यंत ती चारी ओलांडतो तो पर्यंत तेथे ट्रॅफिक होऊन जाते. तर अश्या ज्या मुख्य रस्त्यांवर चाऱ्या असते ना त्या चाऱ्या प्राथमिकतेने लक्ष देऊन भरुन घ्याव्या.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** कॉन्ट्रॅक्टर पण होता, त्यांना सांगितल होत आपण गेट बदलण्याबद्दल, मोठे गेट करायच. अजुनही ते झालेल नाही. आणि जेव्हा ट्रॅक करायच तो पण विषय झाला होता. पण ट्रॅकच पण नुस्त खोदुन ठेवलेल आहे. बाकी पुढे त्याची काहीच हालचाल नाही. मग केव्हापर्यंत करणार आहे ते कामे.

**श्री.अरविंद भासले , शहर अभियंता :-** ट्रॅकच काम सुरु आहे ना मुरुम वगैरे टाकणे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आता दोन तिन दिवसापुर्वी फक्त चाऱ्या करुन ठेवल्या आहे.

**श्री.अरविंद भासले , शहर अभियंता :-** त्याच काम सुरु झालेल आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** चालु केल.

**श्री.अरविंद भासले , शहर अभियंता :-** हो.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** गेटच पण करायला लावा त्यांना.

**मा.आयुक्त :-** दोन्ही काम करायला लावा त्यांना, आपण ठरवुन दिल्याप्रमाणे तो जॅगींग ट्रॅक पुर्ण करा.

**श्री.अरविंद भासले , शहर अभियंता :-** मार्च पर्यंत आहे.

**मा.आयुक्त :-** त्याच प्रमाणे एक जे गेट आहे. मोठी वाहने जाणेसाठी जसा ताईने सांगितले, ते रुंद करुन घ्या.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मोठे गेट तर आहेच पण जे छोटा गेट आहे तो फक्त एका ऐंगलवर दोनच हे टाकलेले आहे त्यांनी.

**मा.आयुक्त :-** ते करतील ते.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** तेवढ ते करुन घ्यायला लावा.

**मा.आयुक्त :-** ते करतील ते. ते दोन्ही गेट आणि जॉगिंग ट्रॅक ३१ मार्च च्या आदी संपवा.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** एस.एम.आय.टी. कॉलेज जवळच ही.

**श्री.नितीन बरडे :-** मला बिल द्यायला सांगा सर. संबंधीत अधिकारी सापडला ना की, त्याच्या पगारामधुन वसुल करा. मी सापडुन देतो तुम्हाला.

**मा.आयुक्त :-** कुठल्याही चुकीच्या कृतीला पाठीशी घातले जाणार नाही.

**श्री.नितीन बरडे :-** संबंधीत अधिकाऱ्याच्या पगारातुन वसुल करा.

**मा.आयुक्त :-** जे जबाबदार असतील त्यांच्यावरती जबाबदारी निश्चित करु.वेळ प्रसंगी नुकसान झाले अशीन तर ते ही वसुल करु.

**श्री.प्रशांत नाईक :-** दोघी नाल्यांना एम.एम.चे पाईप लागत आहे त्यामुळे काम बंद आहे. बऱ्याच वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. आणि जलकुंभ केला आहे आपण सुप्रिम कॉलनीमध्ये तेथे ६०० ते ८०० एम.एम.चे पाईप लागत आहे. बाकी अमृतच कनेक्शन आपण प्रत्येक प्रभागात घेऊन गेलेले आहे. पाणी हे काम झालेले नाही. हे दोन काम पेंडींग आहे.

**मा.आयुक्त :-** साळुंखे

**श्री.प्रशांत नाईक :-** साहेब मक्तेदाराला सांगितल तर ते महापालिकेच नाव म्हणतात आणि महापालिकेवाले जिवन प्राधिकरणाचे.

**मा.सभापती :-** आपली जी १२०० एम.एम.ची जी लाईन जात आहे.ती जी मणियार शाळा आहे. जवळ जवळ दिड ते दोन महिन्यापासुन तुम्ही ते खोदुन ठेवलेल आहे. आणि तो मुख्य रस्ता आहे एम.आय.डी.सी.त जाण्याचा. तेथुन उद्योजक असतील कामगार असतील आणि परिसरातील नागरीक आदर्श नगर, गणपती नगर, रायसोनी नगर, मोहाडी शिरसोली त्या परिसरातुन येणारे सर्व नागरीक त्या रोडने वापरतात.दिड महिन्यापासुन तेथे काम चालु आहे. त्या कामाची गती इतकी संथ आहे की, काही दुरघटना सुध्दा घडलेल्या आहे, काही गाडीवरुन नागरीक पडलेले आहे.ते लवकर का होत नाही.

**श्री.सुशिल साळुंखे :-** ते किमान फेब्रीकेशन होत त्याच अप्रुवल झालेल आहे. जो प्रशांत भाऊंनी विषय काढला होता पाईपाचा तर अमृत योजनेमध्ये आपल्याला जी डी.आय.पी मिळणार होती ते शासनाने पुरवायचे होते. तर त्या करीता शासनाने पैसे वजा केलेले होते. त्यानंतर काय झाल की, एम.जी.पी.चा जे कॉन्ट्रॅक्ट होता त्याच्या

किमती वाढल्यामुळे एम.जी.पी.ने नंतर पाईप दिले नाही. आणि त्याशासन स्तरावर मागविण्यात आलेल आहे. अद्यापपावेतो ते शासन स्तरावर पेंडींग आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** केव्हा होईल मग ते.

**मा.आयुक्त :-** जो काही आहे निर्णय होईल आणि आपल्याला पाईप अव्हेलेबल होतील. आणि त्यांचे ई.एस.आर होतील.

**श्री.नितीन लढढा :-** सर, सुप्रिम कॉलनीचा जलकुंभ हा तयार झालेला आहे. त्या जलकुंभाला फक्त जी.आय. पाईपचा सप्लाय नसल्याकारणाने त्याला जोडणी होत नाही. त्या जलकुंभाला आता फक्त वॉटरप्रुफिंगच काम करायच आणि त्याची टेस्टींग घ्यायची. त्याच्यामध्ये काय झालेल आहे. जलकुंभ तयार झालेला आहे. परंतु पाईप नसल्याकारणाने त्या जलकुंभाची वॉटरप्रुफिंग थांबलेली आहे आणि त्याची टेस्टींग थांबलेली आहे. त्याच्यामुळे जलकुंभ तयार करुन तो मक्तेदार सुध्दा म्हणतो की, माझी साईट कमप्लीट झालेली आहे. त्याला त्याचा काम वाईंडअप करुन बाहेर पडायच आहे. परंतु जी.आय.पाईप नसल्याकारणाने त्याची टेस्टींग प्रलंबित आहे.आणि त्याच्यामुळे ते काम खोडबलेले आहे. मध्यंतरी जैन इरिगेशनच्या अधिकाऱ्यांनी मला सांगितल की, जर जी.आय. पाईप तिडा जोपर्यंत सुटत नाही. तोपर्यंत आम्ही एच.डी.पी.चा पाईप जोडुन सदरहु जलकुंभाची वॉटरप्रुफिंग करुन त्यात पाणी भरुन त्याची चाचणी यशस्वी रित्या करुन महानगरपालिकेला हस्तांतरीत केला तर कमीतकमी त्यांचे बिल रेकॉर्ड होतो तो मक्तेदार तेथुन मुक्त होतो.आणि ज्या वेळेला जी.आय.पाईपचा तिडा सोडेल, त्यावेळेला जी.आय.पाईपची जोडणी सुध्दा त्यांचा एच.डी.पी. पाईप काढुन पुन्हा ते जी.आय.पाईपची जोडणी करुन देतील. जेणे करुन प्रश्न प्रलंबीत राहत नाही. खर्च मक्तेदारालाच करायचा आहे.

**मा.आयुक्त :-** तर आपण तांत्रिक दृष्ट्या इलिजीबल आहे फक्त हे चेक करुन घेऊ आणि आपण पुढे जाऊ.

**श्री.नितीन लढढा :-** हो ना शेवटी टाकीची चाचणी करुन ही टाकी हस्तांतरीत करणे मक्तेदाराची जबाबदारी आहे. परंतु जो पर्यंत जी.आय.पाईप येत नाही तोपर्यंत ही सगळी प्रक्रिया लांबते.

**मा.आयुक्त :-** मुद्दा हाच आहे की, जी.आय.पाईप येई पर्यंत आपण एच.डी.पी.पाईपने कनेक्शन करणे आणि टाकी कार्यान्वीत करणे.

**श्री.नितीन लढढा :-** नाही, टाकी कार्यान्वीत करु नका.

**मा.आयुक्त :-** टेस्ट करुन ठेवावी.

**श्री.नितीन लढढा :-** टाकी टेस्ट करुन ठेवा, कमीत कमी टाकीच बिल टेक आऊट होत आहे. आपली कामाची पध्दती अलग आहे. त्याच्यात सुध्दा काय होत. ते काम अपुर्ण दिसत. आणि अपुर्ण दिसल्या कारणाने आणि जो पर्यंत सक्षम रित्या ते भरले जाऊ शकत असेल. आणि तश्या पध्दतीने ती स्कीम चालु होत असेल. तरी ही त्यांची हरकत नाही. ज्या दिवशी जी.आय.पाईप उपलब्ध होईल. त्या दिवशी ते स्वखर्चाने त्यांचा एच.डी.पी. पाईप काढतील आणि जी.आय.पाईप लावतील.

**मा.आयुक्त :-** बरोबर आहे पण जी रक्कम आपण टेस्टींग साईडला डिटेल करतो ते बघु. आणि जर ते या मार्गाने होत असेल तर एच.डी.पी पाईपने करुन घेऊ.

**श्री.नितीन लढढा :-** टेस्टींगसाठी पाईप ज्या गेजचा लावण्याची जबाबदारी त्यांची आहे. ती टाकी भरण्याची जबाबदारी त्यांची आहे. टेस्टींग महानगरपालिकेच्या नियमानुसार झाले तर त्याला समिकरण करायचे आहे.

**मा.आयुक्त :-** या सोमवारच्या मिटींगला या विषयाला चर्चेला घेऊ काही अडचण नसेल तर आपण करुन घेऊ.

**श्री.नितीन लढढा :-** नक्की म्हणजे एक एक प्रलंबित राहिलेले विषय मार्गी लागतात ना.

**मा.सभापती :-** सुचक अनुमोदक कोण ?

**श्री.नितीन लढढा :-** फक्त नितीन भाऊंची हरकत कायम ठेवुन मान्य करा. बिल अदायगी आणि बिल देण्याच्या संदर्भातली भुमिका.

**मा.आयुक्त :-** बिलांची कॉपी आपण त्यांना देऊ या पण हा अहवाल ॲक्सेप्ट करण्यामध्ये त्यांची सहमती असावी अशी अपेक्षा आहे.

**श्री.नितीन बरडे :-** सर तो चुकीचा तयार केलेला आहे मला माहिती आहे, मी वाहुळे साहेबांना बोलु शकत नाही. मला त्याच दिवशी माहित होत अहवाल कसा तयार केलेला आहे. मला निरोपही येऊन गेला त्याच दिवशी. आणि मी रिटायर झाल्यानंतर तारखा जोडुन घ्या म्हणे.

**मा.आयुक्त :-** एका व्यक्तीचा नाही तर दोघांनी मिळुन तयार केलेला अहवाल आहे.

**श्री.नितीन बरडे :-** मला माहिती आहे ना.

**मा.आयुक्त :-** ते लेखापरिक्षक आहे त्यांच्याकडुन जर काही चुका झाल्या असतील.

**श्री.नितीन बरडे :-** वाहुळे साहेबांना तो विषयच माहिती नाही.

**मा.आयुक्त :-** संशयच वातावरण आपण दुर करायला पाहिजे.

**श्री.नितीन बरडे :-** सर कामे झालेले नाही म्हणुन बोलत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** काय होत साहेब, कनिष्ठ अभियंतांनी आपल्या जबाबदाऱ्या योग्य पध्दतीने पार पाडले तर अशी परिस्थिती येत नाही. त्याच्याने अडचणीचा काय विषय होता. एक कॉमन काम झालेल होते. काही नितीन भाऊंच्या प्रभागात होणे अपेक्षित होत, काही यांच्या प्रभागात होणे काही अश्या पध्दतीने, परंतु कनिष्ठ अभियंतांनी कुठेतरी काम ते एकाच बाजुला केल्यामुळे एका सदस्यावर त्याच्यामध्ये अन्याय झालेला आहे. तर त्याच्यामुळे कनिष्ठ अभियंत्यांनी ज्या पध्दतीने कामाचे नियोजन केले असेल त्याच पध्दतीने काम मार्गी लागायला पाहिजे. असा त्यांचा तो रोष आहे.

**श्री.नितीन बरडे :-** आणि जो रस्ता झालेला आहे दुरुस्ती त्याचे टेन्डर ना काही ना काही.कस काय झाला मग दुरुस्ती.

**मा.आयुक्त :-** मला अस वाटत की, त्यावेळेला वर्कऑर्डर मध्ये जो ऐरिया आपण करायच ठरविल होत. त्या ऐवजी ती क्वांटीटी नंतर वापरली गेली पण वापरली गेली. याबद्दल काही दुमत नसेल. त्यांचे म्हणणे हे आहे की, जे राहुन गेलेले आहे तो आपल्या चालु कामामध्ये कव्हर करावा.

**श्री.नितीन लढढा :-** त्यांचा आक्षेप ठेकेदारावर नाही. त्यांचा आक्षेप काम झाल नाही याच्यावर आहे.

**श्री.नितीन बरडे :-** मी ठेकेदार पाहिलेलाच नाही कोण आहे.

**मा.आयुक्त :-** झालेल्या कामाबद्दल सुध्दा आपण सहमती दर्शविली तर हरकत नाही. परंतु जे काम होणे अपेक्षित होत.

**श्री.नितीन लढढा :-** काम कनिष्ठ अभियंतांच्या घराजवळुन सुरु झाले आणि वाहुळे साहेबांच्या घरापर्यंत जाऊन मोकळे झाले.

**मा.आयुक्त :-** आपल्या महापालिकेचे काम झाल आहे. तर त्यांच्या वार्ड मध्ये राहिले आहे. ते आपण पुढच्या काळामध्ये जे नियोजन ठरलेले आहे त्याच्यामध्ये फेर बदल संबंधीत सदस्यांच्या सहमती शिवाय करु नये. अश्या प्रकारचे धोरण आपण निश्चित करु.

**हे** दुसऱ्यांदा झालेल आहे मागच्या टर्मला ही असेच टेन्डर काढलेले होते. आणि मागच्या टर्मलाही असच झालले होते.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब याच्यामध्ये जर चौकशी झालेली असेल ना. दोषी अंती काही आढळले असेल तर निश्चितच देयके थांबवा पण ज्यांची चौकशी झालेली असेल काम पुर्ण झालेले असेल आणि आपल्या चौकशीतुन समाधान झालेले असेल. तर त्यांचे देयक द्यायला काही हरकत नाही अस मला वाटते.

**मा.आयुक्त :-** मुळ विषय आता असा आहे.

**श्री.नितीन बरडे :-** अमृतकरांची बदली का केली मी नाही सांगुन ही. का केली अमृतकरांची बदली. मी बिलांची मागणी केल्यावर तुम्ही त्यांची बदली केली. मी एम.बी. रेकॉर्ड मागीतले तेव्हा बदली केली आहे.

**श्री.नितीन लढढा :-** तत्कालीन आयुक्त राहिले ना तत्कालीन शहर अभियंता राहिले.

**मा.आयुक्त :-** आता वस्तुस्थिती अशी आहे की, आपण मान्य ही करु . परंतु असे प्रकार पुढे घडु नये याची दखल घ्यावी.

**नगरसचिव** :- निर्णय काय आहे विषय क्र.०२ वर.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब ऐका ना, चौकशी कोणी केलेली आहे, चौकशी करायला गेला कोण. या कामांची चौकशी केली कोणी. सर्वात पहिले मला हे सांगा, या कामाची चौकशी कोणी केली. ही जी चौकशी झालेली आहे जो चौकशी अहवाल आलेला आहे. हा प्रत्येक्ष स्थळावर न जाता झालेला आहे का ? ही जी चौकशी झालेली आहे ही प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी न जाता झालेली आहे का ? साहेब मी सांगतो ना तुम्हाला, तुम्ही स्वत:पण त्या स्पॉटवर येऊन गेले, शहर अभियंताही स्पॉटवर येऊन गेले. आपले इंजिनिअर त्या स्पॉटवर येऊन गेले. सन्मा.सदस्यांनी जी तक्रार केली आमचा तक्रारी बद्दल वाद नाही. जो चुकीचा आहे त्याच्या बद्दल तक्रार झालीच पाहिजे परंतु आमच म्हणण फक्त इतकच आहे साहेब की, जर एखादी मक्तेदार, ठेकेदार एका कामात चुकीचा असेल आणि तुम्ही त्यासाठी १० लोकांना वैठीस धरणार असुन आणि त्या विषयांची वापस

चौकशी करणार असाल तर उद्या उठुन कोणता ठेकेदार येथे काम करायला येणार आहे. सांगा ना साहेब, माझा म्हणणे नाही मुळात भाऊ, ऐका ना, माझ म्हणण हे आहे.

**श्री.नितीन बरडे :-** बिलांबद्दल शंका नाही बिलांना हरकत नाही.

**श्री.कुलभुषण पाटील :-** संपले विषय,

**श्री.नितीन बरडे :-** अधिकारी कसा दोषी आहे मी ते पकडुन दाखवितो तुम्हाला.

**श्री.कुलभुषण पाटील :-** चर्चा झाली माहिती घेतली पुढचा विषय घ्या.

**श्री.नितीन बरडे :-** तुम्ही आज बिले देऊन द्या नंतर पगारातुन वसुल करा ना.

**श्री.कुलभुषण पाटील :-** जो दोषी असेल त्याच्यावर कार्यवाही झालीच पाहिजे. जो दोषी असेल त्याच्या वेतनातुन कपात करा.

**श्री.नितीन बरडे :-** मी तुम्हाला पकडुन दाखवतो ना ही जबाबदारी माझी.

**श्री.कुलभुषण पाटील :-** पुढचा विषय घ्या.

**सौ.ज्योती चव्हाण :-** नितीन भाऊ बरडेंनी जे सांगितले ते एकदम खरं आहे. माझ्याही वार्डात मी तुमच्याकडे अशीच कमप्लेन्ट दिलेली आहे की, कार्यादेश दिल्यावर सुध्दा ठेकेदार काम करत नाही. त्याची मुदत संपुन गेलेली आहे. मार्च मध्ये त्याचा पैसा हा परत जाणार होता. तरी पण त्यानी काम केलेले नव्हते. मी दोन वेळा, एकदा साहेबांकडेही तक्रार केलेली होती. त्यानंतर ते काम झाले ते काम सुरु केले.

**मा.आयुक्त :-** कोणत्या कामाचे सांगता.

**सौ.ज्योती चव्हाण :-** प्रभाग क्र.१३ मध्ये १०% कमीने काम घेतात ते ठेकेदार. वॉल कम्पाऊंडला चैनलिंग फेंसींगच कामे होते ते आणि मग त्याची मुदत मार्च मध्ये संपत होती. मग मी तुम्हाला एक लेटर दिले आणि त्याप्रमाणे तुम्ही सर्वांनी केले. आणि ते काम नंतर सुरु केले. जस नितीन भाऊ बोलले की, इंजिनिअरांनी तिथे लक्ष दिले पाहिजे. तर लक्ष दिल जात नाही. मी त्यांच्या मताने सहमत आहे. कारण आदीच काम १०% बिलोने दिलेले असतं. आणि इंजिनिअर तेथे राहत नाही. त्या कामाची पातळी म्हणजे त्याची क्वांटीटी एकदम खराब असते.पुढच्या एखादे वर्षात ते काम इतक निकृष्ट दर्ज्याचे दिसते. मग नागरीक आपल्याला बोलतात की, हे काम त्यांनी केले आहे. हे असे होत आहे. असच या रस्त्यांबद्दल मागे तुम्ही नव्हते मला वाटत.असेच रस्ता दुरुस्ती बद्दलच निघाल होत टेन्डर त्याही प्रभागात न होता पास झाल. ही जी बाब त्यांनी सांगितली ती एकदम खरी आहे. तर याची खरच चौकशी करा आणि संबंधीत जे इंजिनिअर आहे. त्याच्या कडुन हे कामे करुन घेतले गेले पाहिजे. आता या डॉकेट मध्ये पुढे जे येणाऱ्या संविदा आहे. त्याच संविदांमध्ये प्रभाग क्र.१३ ची एक संविदा आहे. त्याचही त्या ठेकेदाराने काम घेऊन खुप दिवस झालेले आहे. कार्यादेश दिले गेलेले आहे पण त्याने कामच केलेले नाही. आणि त्याचे पुर्वीचे जे डि.एस.आर.रेट होते. तर आताचे डि.एस.आर.रेट वाढल्यामुळे तो आताही काम करत नाही. आणि आताचा जो निधी आहे तो मार्च मध्ये परत चालला जाणार आहे. अशीच संविदा आता पण आली.हे अस होत आहे साहेब तर आपण याच्याकडे लक्ष द्या ऐवढी एक विनंती आहे. व माझे अनुमोदन आहे.

**मा.सभापती :-** मला वाटत प्रभागाचे जे शाखा अभियंता आहे. त्यांनी प्रत्येक्ष साईटवर पाहणी करावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र ३१६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सन्मा.नगरसेवक यांनी शहरातील रस्ते दुरुस्तीचे चौकशी बाबत दि.२५/०८/२०२० रोजी दाखल केलेल्या पत्राच्या अनुषंगाने आयुक्त यांनी दि.१५/०९/२०२० रोजी प्रभारी शहर अभियंता व मुख्य लेखापरिक्षक यांचा समावेश असलेली समिती स्थापन करुन समितीने तक्रार अर्जा मधील प्रत्येक मुद्दा बाबत कागदपत्रे तपासुन आवश्यकते प्रमाणे प्रत्यक्ष पाहणी करुन अहवाल सात दिवसात सादर करावा असे आदेशीत केले आहे.

त्यानुसार तत्कालीन प्र.शहर अभियंता श्री.डि.एस.खडके व मनपाचे मुख्य लेखापरिक्षक यांनी सन्मा.नगरसेवक श्री.नितीन मनोहर बरडे यांनी शहरातील रस्ते दुरुस्तीचे चौकशी बाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आयुक्त यांच्या आदेशानुसार सन २०१९-२० मध्ये शहरात विविध प्रभागामध्ये रस्ते दुरुस्ती कामी ०८ कार्यादेशातील कामा संदर्भात चौकशी पुर्ण करुन त्या बाबतचा चौकशी अहवाल तयार करुन दिलेला असुन सदर चौकशी अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १२** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

**नगरसचिव :- विषय क्र. ३:-** नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत मनपास सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात रक्कम रु.५.०० कोटी अनुदान मंजुर करण्यात आलेले आहे. सदर योजने अंतर्गत १ ते १० कामांकरीता रक्कम रु.५,०२,१७,४२७/- मात्रची प्रशासकीय मान्यता मा.जिल्हाधिकारी,जळगांव यांच्या कडुन प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्राप्त अनुदाना पेक्षा जादा होणारा खर्च रक्कम रु.२,१७,४२७/- मात्र मनपा अर्थसंकल्प लेखा शिर्ष नविन रस्ते यातुन करण्यास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३१७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत खालील १ ते १० कामे समाविष्ट करण्यास महासभा ठराव क्र.३०८ व ३१७ दि.२३/०९/२०१८ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार पत्र क्र.सांबा/११०८/२०२० दि.०५/११/२०२० व पत्र क्र.सांबा/११०९/२०२० दि.०५/११/२०२० नुसार उक्त कामांना प्रशासकीय मान्यता मिळणे करीता जिल्हाधिकारी,जळगांव यांचे कडेस प्रस्ताव सादर केला असता उक्त प्रस्तावास जिल्हाधिकारी,जळगांव यांचे कडील पत्र क्रं.नपा/नादवसुयो/आर.आर./४०५/२०२० दि.२१/१२/२०२० अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | तांत्रिक मंजुरीची रक्कम | प्रशासकीय मंजुरी रक्कम |
|---|---|---|---|
| १. | प्रभाग क्रं.१० पिंप्राळा भैरवनगर गट नं.१७३ येथे कॉक्रीट रस्ते तयार करणे. | रु.३२,४९,०२९/- | रु.३२,४९,०२९/- |
| २. | प्रभाग क्रं.१० पिंप्राळा मुंगळे शाळा खंडेरावनगर ते जी.प.कॉलनी पर्यंत आणि खंडेराव नगर ते मयुर कॉलनी जोड रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे. | रु.३९,८१,११३/- | रु.३९,८१,११३/- |
| ३. | प्रभाग क्रं.१० पिंप्राळा जी.प.कॉलनी ते हुडको दर्गा पर्यंत रोड साईडने कॉक्रीट गटारी तयार करणे. | रु.३९,९८,१४२/- | रु.३९,९८,१४२/- |
| ४. | प्रभाग क्रं.१० पिंप्राळा जी.प.कॉलनी रोड साईडने कॉक्रीट गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु.७,५०,८०६/- | रु.७,५०,८०६/- |
| ५. | प्रभाग क्रं.१० मधील पिंप्राळा तलाठी कार्यलय ते आशाबाबा नगर रेल्वे बोगदया पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे. | रु.३९,७५,४५६/- | रु.३९,७५,४५६/- |
| ६. | प्रभाग क्रं.१० पिंप्राळा गट नं.२१९ मधील गौतम नगर बौध्द वसाहत मध्ये कॉंक्रीट पाथवे तयार करणे. | रु.२९,९६,४८४/- | रु.२९,९६,४८४/- |
| ७. | प्रभाग क्रं.१० मधील पिंप्राळा गट नं.२००/१, २००/२, २००/३, १७४/अ व आनंदबन हौसिंग सोसायटी मधील रस्ते डांबरी करण करणे. | रु.४९,९२,३९१/- | रु.४९,९२,३९१/- |
| ८. | प्रभाग क्रं.१० मधील खंडेरावनगर रेल्वे पुल ते हुडको दर्गा पर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | रु.५८,९१,५५०/- | रु.५८,९१,५५०/- |
| ९. | प्रभाग क्रं.०३ गोपाळपुरा ते हरी ओम नगर जुना असोदा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.८९,९८,०८५/- | रु.८९,९८,०८५/- |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | प्रभाग क्रं.०३ गोपाळपुरा ते खेडी मधील खडके शाळेपर्यंत जुना खेडी रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,१३,८४,३७१/- | रु.१,१३,८४,३७१/- |
| | एकुण रक्कम रु. :- | रु.५,०२,१७,४२७/- | रु.५,०२,१७,४२७/- |

वर नमुद १ ते १० कामास जिल्हाधिकारी,जळगांव यांनी दिलेल्या प्रशासकीय मान्यता आदेशात नमुद केल्याप्रमाणे सन २०२०-२१ या आर्थीक वर्षाकरीता रक्कम रु.५.०० कोटी मात्रचे अनुदान अनुज्ञेय केलेले असल्याचे सुचित केलेले आहे त्यामुळे प्रशासकीय मान्यता रक्कम रु.५,०२,१७,४२७/- मात्र पैकी रक्कम रु.२,१७,४२७/- मात्रची रक्कम मनपा फंडातुन करण्या संदर्भात सुचित केलेले आहे. त्यामुळे जादा खर्च होणारी रक्कम मनपा फंडातुन करावी लागणार असल्याने जादा होणारा खर्च रक्कम रु.२,१७,४२७/- मात्र मनपा अर्थसंकल्प लेखा शिर्ष नविन रस्ते यातुन करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १२** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्र. ४:-** जळगांव शहरातील मेलेले जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे कामी १) श्री.नंदु शहादु नाडे २) श्री.अशोक रामा सोनवणे यांची तात्पुरत्या स्वरुपात मानसेवी कामगार म्हणून मानधनावर ६ महिन्याकरिता नेमणूक करणे व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु.१,६८,०००/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय याच्यात मला काही सुचना द्यायचे आहे. हा विषय मान्य करण्यात यावा पण एक विषय असा आहे. मागील महासभा स्थायी समिती सभेत चर्चा झाली होती दोन कर्मचारी वाढविण्याच्या संदर्भात, त्याच काय झाल. ऐवढी लोकसंख्या वाढलेली आहे तरीही इतका उशीर होत आहे. एक वर्षापासुन सांगतो आहे मी. काय झाल त्याच.

**सौ.ज्योती चव्हाण :-** माझे अनुमोदन आहे आणि प्रत्येक प्रभाग समितीला एक एक द्या अशी मागणी होती आमची मागेपण.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** दोन आहे अजुन दोन द्या.

**श्री.पवन पाटील, सहा.आयुक्त :-** हा काम जो आहे ना ते थोडा अस्वच्छ स्वरुपाचा असल्यामुळे हे काम करण्यासाठी कोणीही माणस तयार नव्हते परंतु आता मागच्या आठवडयामध्ये तीन लोकांचे अर्ज आलेले आहे. त्यांना नेमण्याची प्रक्रिया आता चालु होईल.पुढच्या स्थायी समिती व महासभेमध्ये आपण ते प्रस्ताव ठेवणार आहोत.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब त्यांना एक ड्रायव्हर आणि एक हेल्पमन उपलब्ध करुन द्या.

**श्री.पवन पाटील, सहा.आयुक्त :-** हो ते तर आपलेच आहे. ते लगेच उपलब्ध होऊन जातील, फक्त हे माणस मिळत नव्हते किती दिवस. ते आपल्याला आता मिळालेली आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३१८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३०९ (१) नुसार शहरातील मेलेले जनावरांची प्रेत उचलुन त्यांची विल्हेवाट लावणे महापालिकेचे कर्तव्य आहे. अर्जदार / मानसेवी कामगार श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे यांनी दि.०५/०२/२०२१ रोजी अर्ज देवून शहरातील मेलेले जनावरे उचलणे कामाकरिता ६ महिने करिता मुदत वाढीचा अर्ज केलेला आहे.

तसेच श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे,मानसेवी कामगार हे गेल्या १५ ते २० वर्षापासून ६ महिन्याचे मुदतीवर प्रत्येकी रु.१४,०००/- प्रमाणे मानधनावर दोन्ही कामगार

शहरातील दैनंदिन मेलेले जनावरे उचलणेचे काम व्यवस्थित करित असून स्थायी समिती ठराव क्रं.२८८ दि.२४/११/२०२० मंजूरी अन्वये दरमहा रु.१४,०००/- मानधनावर शहरातील मृत जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ अन्वये अटी शर्तीस अधीन राहून तात्पुरती नियुक्ती करणेस मान्यता प्रदान केलेली आहे. सदरची मुदत दि.०१/०९/२०२० पासून ते पुढील ६ महिने दि.२२/०२/२०२१ रोजी संपत असल्याने पुढील ६ महिन्याच्या कालावधीसाठी पुन्हा दोन दिवसांचा खंड देवून मुदतवाढ देणे आवश्यक असल्याने श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे, मानसेवी कामगार यांना पुर्वीच्या नियुक्ती मध्ये २ दिवसांचा खंड देवून दि.२५/०२/२०२१ ते दि.२४/०८/२०२१ पर्यंत (६ महिने) तात्पुरती नियुक्ती देणे कामी दरमहा रक्कम रु.१४,०००/- प्रती कामगार याप्रमाणे सहा महिनेकरिता एकूण रक्कम रु.१,६८,०००/- मात्रचे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ नूसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १२** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

**नगरसचिव :- विषय क्र. ५:-** प्रभाग समिती क्रं.२ अंतर्गत अर्जदार श्री.प्रकाश चेलाराम कुकरेजा राहणार २०५, कंवर नगर, सिंधी कॉलनी, जळगांव यांची पाणीपट्टीची आकारणी रक्कम रु.२७,५६५/- मात्र निर्लेखित करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**श्री.किशोर बाविस्कर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३१९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग समिती क्रं.२ अंतर्गत वसुली प्रभाग क्र.०२/०७ अ.नं.१/४०७ श्री.प्रकाश चेलाराम कुकरेजा यांची कंवरनगर भागात मिळकत असून त्याठिकाणी एक नळ संयोजनाची नोंद असून मिळकतदार पाणीपट्टीची व घरपट्टीची रक्कम नियमीत अदा करीत आहे. स्थळ निरीक्षण व पंचनामा अहवालानुसार अर्जदार यांचे कंवरनगर येथील मिळकतीत दोन नळसंयोजन नाही. बाबानगर येथील तसेच कंवरनगर येथील मिळकती वेगवेगळया आहेत. एन.डी.सी.सी. सेवानिवृत्त सैनिक खाजगी संस्था यांच्या अधिकृत नळसंयोजन संदर्भात सर्वेक्षण अहवालात बाबानगर भागातील एका मिळकतीच्या ठिकाणी श्री.प्रकाश चेलाराम कुकरेजा या नावाने अधिकृत नळसंयोजन आहे. पाणीटंचाई काळात शहरात बोअरवेल / विहीरीवरुन वॉटरपंप बसवुन पर्यायी पाणीपुरवठा व्यवस्था करण्यांत आली होती. अनाधिकृत नळ संयोजन अहवालानुसार मागणी रजिष्टरला सन २०१५-१६ पासुन अ.नं.११७१ वर नोंद घेण्यांत आलेली आहे. बाबानगर येथील मिळकतीच्या ठिकाणी असलेले नळसंयोजन हे पर्यायी पाणीपुरवठा योजने अंतर्गत उपलब्ध करुन देण्यांत आलेले असल्याने विहीरीवरुन घेतलेल्या नळास पाणीपट्टीची आकारणी करता येणार नाही. व त्यास अधिकृत नळ संयोजन म्हणता येणार नाही.

सबब मिळकतदार श्री.प्रकाश चेलाराम कुकरेजा यांनी दिलेल्या अर्जानुसार अनाधिकृत नळ संयोजनापोटी करण्यांत येत असलेली पाणीपट्टीची आकारणीची (नळ संयोजन नसल्याने) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १५२ नूसार रक्कम रु.२७,५६५/- मात्र निर्लेखीत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १२** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्र. ६ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय आणि आयुक्त साहेब, या संविदांबद्दल या संविदा मध्ये विषय क्र.३ आणि विषय क्र.४ हे ५ कोटी अनुदानातले विषय आहे साहेब, हे ५ कोटी अनुदान आपल्याला जेव्हा मिळाल होत. त्यावेळेस ज्या ज्या मक्तेदारांना कार्यादेश देण्यात आलेले होते. त्या मक्तेदारांनी जवळपास ९०% कामे पुर्ण केलेले आहे. ५ कोटी अनुदानातले २-४ कामे जे बाकी राहिलेले आहे साहेब, याच्यामध्ये मक्तेदारांची चुकी नाही. या कामांमध्ये मक्तेदारांची चुकी नाही. साहेब यांना कार्यादेशच मुळात उशिरा मिळालेले आहे. याच्यामुळे काय झाल साहेब, मक्तेदार आज रोजी काम करायला तयार नाही. कारण की त्यांचे म्हणणे आहे की, ज्या वेळेस या कामांचे नियोजन झाले त्या वेळेचे डि.एस.आर.रेट जे होते. तर आताचे डि.एस.आर.रेट मध्ये ५ ते ७ रुपयाने फरक पडलेला आहे. आणि ऑलरेडी आम्ही हे कामे कमी दराने घेतलेले आहे. त्यामुळे आम्हाला हे कामे परवडणार नाही. त्याच्यामुळे चुकी त्यांची नाही, यांना टेक्नीकल कारणामुळे कार्यादेश वेळेवर मिळालेले नाही. याच्यात मक्तेदाराची चुक नाही. साहेब असेच विषय जे आहे सन २०१६-१७ दलितवस्ती अंतर्गत तत्कालीन प्रभाग क्र.१४ मध्ये शासनाकडुन ५ कोटी अनुदान मंजुर झालेले होते. त्याच्यामध्ये सन २०१६-१७ मध्ये जे निधी अनुज्ञेय झालेले होते. आता पर्यंत गट नं.२१७ मध्ये ३० लक्ष रुपयाचे गटार करणे, गट नं.१७६ मध्ये २५ लाख रुपयाचे गटार तयार करणे असे कामे होते. साहेब त्या ठेकेदाराने आज रोजी सुध्दा त्या गटारींसाठी खड्डा खोदला गेला नाही. आज पर्यंत ते काम तसेच्या तसे राहिले आहेत. आज साहेब ४ वर्ष झाले. आज ४ ते ५ वर्ष झाले. तो ठेकेदार काम ही करत नाही. तो निधी तसाचा तसा पडुन आहे आपल्याकडे. साहेब मला एक समजत नाही. शासनाकडुन अनुज्ञेय असलेल्या निधी मध्ये ठेकेदार ५-५ ७-७ टक्के ने काम घेतात.वेळेत पुर्ण करत नाही. ठेकेदारांना आपले मनपा अधिकारी पाठीशी का घालतात. साहेब जो निधी आपल्याला मिळालेला आहे तो निधीचा वेळेवर काम होत नाही. तर मग शासनाने आपल्याला पैसे द्यायचे कशासाठी. आणि जर आपण वेळेत काम पुर्ण करत नसाल तर आपण शासनाकडे मागणी करायची कशासाठी. आता तिसऱ्यांदा हा विषय सभागृहात घेतो आहे.

**मा.आयुक्त :-** त्यांचे म्हणणे आहे की, जी जुनी टेन्डर आहे. आणि जुनी टेन्डरवर आपण ते प्राईज काऊंटीटी दिली तर जुने टेन्डर आहे ते बिलो आहे. म्हणुन तो ठेकेदार काम करत नाही. ते टेन्डर जुने आहे की नविन आहे.

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** ते टेन्डर याच वर्षातले आहे, प्रशासकीय मान्यता उशिरा झाल्यामुळे ते वर्कऑर्डर दिलीच गेली नाही.

**मा.आयुक्त :-** काम करण्यासंदर्भात डि.एस.आर.ची काही अडचण आहे का ?

**श्री.कुलभुषण पाटील :-** चार वर्ष आगोदर मिळालेले निधीचे काम आपण आज रोजी करणार साहेब. आपण प्रशासकीय मान्यतेसाठी त्यापासुन पाठपुरावा केला असता तर इतर वर्ष नाही लागले असते साहेब.

**सौ.ज्योती चव्हाण :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.आयुक्त :-** त्या वर्षाच आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** हो ना साहेब, निधी तर तेव्हाच आहे, डि.एस.आर.रेट ही तर तेव्हाचे आहे ना साहेब.

**मा.आयुक्त :-** मग त्याप्रमाणेच टेन्डर भरले असेल.

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही. डि.एस.आर.रेट जुने आहे.

**मा.आयुक्त :-** डि.एस.आर.असु द्या. टेन्डर मात्र या वर्षाचे आहे. त्याला रेट या वर्षी वाढविलेले होते.

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** हे जे ४ नंबरचे काम आहे ना ते होऊन गेलेले आहे.

**मा.आयुक्त :-** ४ नंबरला काही अडचण नाही. हे ३ नंबरच.

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** ३ नंबरच्या मक्तेदारासोबतच करावे लागेल ते काम.
**सौ.ज्योती चव्हाण :-** हे ३ नंबरच जे मी बोलेली आहे.
**श्री.कुलभुषण पाटील :-** तो यांच्याकडचा विषयच नाही.
**मा.आयुक्त :-** नाही त्यांची काम करण्याबद्दलची काही अडचण टक्के बदलाची आहे.
**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** त्यांनी जे टेन्डर भरलेले आहे ते आता मला परवडत नाही असे म्हणत आहात ते.
**श्री.कुलभुषण पाटील :-** डि.एस.आर. रेटने मला परवडत नाही असे म्हणत आहे ते.
**मा.आयुक्त :-** ठिक आहे जर त्याला परवडत नसेल किंवा काम करणे शक्य होत नसेल. तर त्यांनी लेखी द्या आणि फेर टेन्डर करुन टाका पण याला मुदत फार कमी आहे.
**सौ.ज्योती चव्हाण :-** मार्च पर्यंतच आहे.
**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** काम होण्यासारखे आहे. होऊ शकते.
**मा.आयुक्त :-** दर आताचे असेल आणि टेन्डर जुणे असेल तर होईल का ते.
**सौ.ज्योती चव्हाण :-** त्याला वर्ष लागेल.
**मा.आयुक्त :-** टेन्डर या आर्थिक वर्षाचे आहे की मागच्या वर्षाचे.
**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** या वर्षाचेच आहेत.
**मा.आयुक्त :-** यात मक्तेदाराची चुक आहे.
**श्री.नितीन लढढा :-** मक्तेदाराची चुक आहे मक्तेदाराने या सर्व गोष्टींचा अभ्यास करुन टेन्डर प्रिंट करायला पाहिजे.
**मा.आयुक्त :-** तीन वर्षापुर्वीच्या टेन्डरला जर आज आपण वर्कऑर्डर देत असाल तर कदाचित त्याचा आक्षेप योग्य ठरेल. भलेही टेन्डर जुने जरी असले, टेन्डर आखले आहे, तर टेन्डर मधील अबावु बिले त्यांनी पाहुन घेतले पाहिजे.
**श्री.नितीन लढढा :-** तर ही जबाबदारी मक्तेदाराने ओळखली पाहिजे.
**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** भाऊ, त्या लेव्हलचे काम, त्या वेळेलाच पडत आहे ना मक्तेदाराला.
**श्री.कुलभुषण पाटील :-** हे टेन्डर प्रोसेस करंट मध्ये झालेली आहे की, तेव्हा झालेली आहे ते सांगा.
**मा.आयुक्त :-** टेन्डर या आर्थिक वर्षात झालेले आहे की, ज्या वेळेला प्रशासकीय मान्यता मिळाली तेव्हा झालेले आहे.
**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** याच आर्थिक वर्षामध्ये झालेले आहे.
**मा.आयुक्त :-** संपला विषय.
**श्री.कुलभुषण पाटील :-** टेन्डर प्रोसेस या आर्थिक वर्षात झाली आहे का ?
**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** याच आर्थिक वर्षात झालेली आहे.
**मा.आयुक्त :-** कुलभुषण भाऊ असा जर असेल तर मक्तेदाराने टाळाटाळ करणे बरोबर नाही. आपण त्याच्याशी बोलुन काम करुन घेऊ.
**श्री.कुलभुषण पाटील:-** असे झालेले असेल आणि त्यानी गृहित धरलेले असेल तर त्यांच्यावर जबाबदारी फिक्स करा.
**मा.आयुक्त :-** आपण बोलुन घेऊ त्याच्याशी.
**श्री.नितीन बरडे :-** अश्या मक्तेदारांवर कार्यवाही व्हायला पाहिजे.
**श्री.प्रशांत नाईक :-** यांना ब्लॅक लिस्ट करा साहेब.
**श्री.कुलभुषण पाटील :-** सुवर्ण जयंती निधी अंतर्गत पैसे मंजुर झाले होते. त्या ठेकेदाराने पण अजुन पर्यंत काम सुरु केलेले नाही साहेब.
**मा.आयुक्त :-** तुम्ही या विषयाची काय पार्श्वभुमी आहे ती जाणुन घ्या. मक्तेदाराची चुक असेल तर त्याच्यावर कार्यवाही करावी.
**श्री.कुलभुषण पाटील :-** जो कोणी दोषी असेल त्याच्यावर कार्यवाही करा.
**श्री.नितीन लढढा :-** कंपाऊंड वॉल करणे, मी याच्यापुर्वी ही बोललेलो आहे की, या शहराच्या प्राथमिकता काय आहे. हे पहिले प्राथमिकतेने बघितले गेले पाहिजे. हा निधी आज खर्च करणे अपेक्षित नाही. एकीकडे आपण या शहरामध्ये गटारी देऊ शकत नाही. एका ठिकाणी आपण रस्ते देऊ शकत नाही. आणि मग

आमदार निधी असेल, नगरोत्थानच असेल, नागरी दलित्तेतरच असेल,कुठलाही निधी असेल. परंतु जरी कधी सभागृहाचा तो अधिकार असेल की, त्यांनी प्रस्तावीत केलेली कामे, प्रशासनाने मान्य करायला पाहिजे. परंतु आपण आयुक्त महोदय म्हणुन अश्या पध्दतीच्या प्रस्तावांना कुठेतरी आपल मत व्यक्त करायला पाहिजे. या शहराच्या प्राथमिकता या प्रायोरिटीने ओळखले पाहिजे आणि ते निश्चित केल्या पाहिजे. म्हणजे अनेक कामे असे आहे. २५ कोटीतली यादी बघाल तुम्ही, ती याच पध्दतीची आहे. आणि अश्या पध्दतीने काय होत आहे की, लोकांना चालायला रस्ते नाही. परंतु आपण काय करतो आहे. कंपाऊंड वॉल करतो, चेनलिंग फेंसींग करतो, वेगवेगळया निधीच्या माध्यमातुन तश्या पध्दतीचे प्रस्ताव येत आहे. मला वाटते, कुठेतरी आपण आयुक्त म्हणुन अश्या प्रस्तावांना आपले मत व्यक्त करुन आणि वेळ पडल्यास असे प्रस्ताव आपण राज्य शासनास विखंडनाला सुध्दा पाठवु शकतात. जरी तो या सभागृहाचा आणि सभासदाचा अधिकार असेल. परंतु आयुक्त म्हणुन या संपुर्ण शहराची योग्य ती जबाबदारी आणि योग्य ती निगरानी राखणे ही आपली सुध्दा जबाबदारी आहे. कारण हा निधी आज खर्च करण्याची गरज नाही आणि तशी परिस्थिती पण नाही आहे महानगरपालिकेची. आज आपण शहरातील कुठल्याही कान्याकोपऱ्यात जा. रस्त्यांची समस्या ही अत्यंत गंभिर आहे. जरी आपण आपल्या अर्थ संकल्पीय मनोगतात जे व्यक्त केलेले आहे की, साधारणता आपण १०५ कोटी आणि राज्य शासनाच्या निधीच्या अनुषंगाने साधारणता १५० कोटी रुपयांचे कामे आपण पुढच्या वर्षापर्यंत मार्गी लावु. परंतु मी म्हणतो १५० कोटी रुपयांमध्ये सुध्दा या शहराच्या नागरीकांचे समाधान होऊ शकत नाही. या नागरीकांना आपण ज्या पध्दतीने आश्वासीत केलेले आहे. त्या पध्दतीने प्राथमिक सोईसुविधा देणे हा कर्तव्याचा भाग आहे आपला. आणि अश्या पध्दतीने अनागाई खर्च वेगवेगळया कामांवर होत असेल. कामाची निकड बघुन आणि कामाची प्राथमिकता ठरविणे हे आपले सुध्दा कर्तव्याचा भाग आहे आणि आपण खुप काळजीपुर्वक मी म्हणतो ना आपल्याकडे निधी खुप तोकडा आहे. आणि तोकडया निधी मध्ये जर की, योग्य नियोजन नाही झाले. तर मी म्हणतो तो निधी नजरेला सुध्दा पडत नाही. आणि समस्या आवासुन कायमस्वरुपी तश्याच्या तश्याच दिसतात. जो पर्यंत आपण शहराचे पुढचे कामे १५० कोटीचे कामे घेण्याचे प्रयत्न करु त्यावेळेला हे १५० कोटीचे केलेले कामे सुध्दा मेनटेनन्सवर येऊन जातील. तर हा जो कालचक्र जो आहे पुर्ण होणारच नाही कधी. म्हणुन आपण आमदार महोदयांना ही विनंती करायची, मा.सभापती महोदयांना ही विनंती करतो, मा.महापौरांनाही विनंती करतो. कामांचा नियोजन अत्यंत सुयोग्य पध्दतीने करावा. मी म्हणतो, सदस्यांच्या मागण्या त्यांच्या दृष्टीकोणातुन वाजवी असतील. पण त्यांना या गोष्टी प्रशासनाने लक्षात आणुन द्यायला पाहिजे की, तुमच्या प्रभागामधील रस्त्यांची जर प्राथमिकता असतील तर ते याच्या मोबदल्यामध्ये सुचवु आपण. तरच आपण या शहरातील नागरीकांना काही तरी दिलासा देऊ शकतो.

**मा.सभापती :-** सन्मा.नितीन भाऊ, सर्व सभागृहाला, ज्या वेळेस आपण जळगांव शहराचे रस्त्याचे काम हाती घेऊ शकत नव्हतो. आपल्या शहरात अमृत योजनेच्या माध्यमातुन पाईप लाईनचे काम चालु आहे, अन्डरग्राऊंड गटारचे काम चालु आहे. आज ही आपण बघतो की, प्रत्येक प्रभागासाठी आपण ५० -५० लाख रुपये डागडुगीसाठी दिले. ते सुध्दा आपण खर्च करु शकत नाही. अशी अवस्था जळगांव शहराची आहे. म्हणुन आपल्याला त्यावेळेची चेनलिंग फेंसिंग असेल. नाल्याच्या संरक्षण भिंती असतील. अश्या कामांवर आपण हा निधी खर्च केला. आणि आज आपल्या शहरामध्ये एल.ई.डी.चे काम पुर्ण होण्यात आलेले आहे. अमृतच्या पाईप लाईनचे काम पुर्ण होण्यात आलेल आहे. अन्डरग्राऊंड गटारच ही काम पुर्ण होण्यात आलेले आहे. ज्या मुलभुत गरजा आहे त्या जवळ जवळ पुर्ण होण्याच्या तयारीत आपण आलेलो आहे. आता राहिला फक्त विषय रस्त्यांचा, भविष्यात आपल्याला रस्त्या व्यतिरिक्त कुठल्याही सुविधा पुरवायचे नाही. म्हणुन भविषयात येणारा हा सर्व निधी आपण रस्त्यांवरतीच खर्च करणार आहोत. याची आपण नोंद घ्यावी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय, विशेष म्हणजे, ही जी १७ मजली इमारत आहे आपली, येथे जो झेंडावंदन करणारा जो वॉचमन आहे. २० वर्षापासुन तो एकच व्यक्ती तेथे आहे. आता त्याच्या डोळयाच ऑपरेशन झालेले आहे. दुसऱ्या डोळयाचे ऑपरेशन होणार आहे. एखाद्या वेळेस जर कधी तो झेंडा उलटा सिदा फडकावला, मागे त्याच्यावर कार्यवाही ही झालेली होती. १० वर्षा पहिले, जेव्हा त्याचे ऑपरेशन झालेले होते. तर त्याला एक जुनियर वॉचमन देण्यात यावा. १७ मजली जी इमारत आहे आपली, वेळोवेळी आपल्या पाईप लाईन लिकेज होतात चोकअप होतात. त्यासाठी मी मागे एक पत्र दिले होते. श्री.पवन पाटील साहेबांना, ती मशीनरी उपलब्ध करुन द्यावी. फॅनसींग मशिन आणि जेटींग मशिनसाठी ते मी पत्र दिलेले होता.

ते तुम्ही उपलब्ध करुन द्यावे. मागे ज्या दिवशी पाईप लाईन लिकेज झाली त्या दिवशी पाणी पुर्ण जिन्यामध्ये गळत होते. मशिनरी उपलब्ध झाल्यास ती साफसफाई होईल. आपल्या कर्मचारींचा पण ताणही कमी होईल. ही गोष्ट लक्षात घ्यावी.

**श्री.नितीन लढढा :-** सभापती महोदय, अनुकंप धारकांच्या संदर्भातला विषय या स्थायी समिती मध्ये अश्वस्त केलेले होते. त्या अनुषंगाने दि.२३ फेब्रुवारी रोजी शासनकडचा पत्र प्राप्त झालेला आहे. आणि त्या पत्राच्या अनुषंगाने तात्कालीन नगर परिषदेची जी मंजुर पदे आहे. ती पद शासनाने मंजुर केलेली आहे. व त्या वरील नियुक्त्या या विहित मार्गाने झालेल्या आहेत का? याची खातरजमा करुन तसे अनुकंप नियुक्तीबाबतचे नगरविकास विभागाचे धोरण विचारात घेऊन अनुकंपावर नियुक्ती देणेबाबत कार्यवाही करावी. आता आपल्याला जी अडचण होती. मागच्या सभेमध्ये जे आपण ज्या वेळेला चर्चा केलेली होती. त्यावेळेला राज्य शासनाकडुन या गोष्टीचा खुलासा अपेक्षित होता. मला वाटतो तो खुलासा आता आलेला आहे. आता या खुल्याशाचे अनुषंगाने विहित पध्दतीचा अवलंब केला गेलेला असेल. ज्या वेळेला मुळ भरती झालेली असेल. तर माझ्या माहिती प्रमाणे सन २०१७ मध्ये या सगळया गोष्टींची छाननी सुध्दा झालेली आहे की, या नियुक्त्या विहित पध्दतीचा अवलंब करुन झालेल्या होत्या की, नाही. परंतु पुन्हा अश्या पध्दतीने ही भुमिका किंवा अशी वस्तुस्थिती या सभागृहासमोर येणे अपेक्षित नाही की, पुन्हा काही तरी कारणासाठी हा विषय पुन्हा पेन्डींग पडलेला राहिल. असे होता कामा नये.तर या सभागृहाला प्रशासनाकडुन एवढेच अपेक्षित आहे. त्यांनी या सभागृहाला पुनश्च एकदा अश्वस्त करावे की, या शासनाच्या निर्देशाप्रमाणे या अनुकंप धारकांना आपण कुठपर्यंत सेवेमध्ये समाविष्ट करु.एवढेच एक उत्तर आपल्याकडुन अपेक्षित आहे.

**मा.आयुक्त :-** आता आकाश डोईफोडे यांनी बरेचसे काम पुर्णत्वावर नेले होते, आता त्यांच्या स्वत:च्या लग्नासाठी अर्जीत रजेवर गेलेले आहे. आता सामान्य प्रशासनाचा कार्यभार अतिरिक्त आयुक्त यांच्याकडे दिलेला आहे. ते हा विषय सगळा समजुन घेत आहे. कालच्या पत्राच्या आगोदर जे आपण स्थायी समिती सभेमध्ये चर्चा केलेली होती. त्याच्यानंतर आदरणीय महापौरांच्या कॅबीन मध्ये सर्व पदाधिकारी आणि मा.आमदार साहेब यांची बैठक झाली होती. त्याच्यामध्ये आपण शासनापुढे दोन पर्यायी प्रस्ताव पाठविलेला होता की, ज्यावेळेस स्थायी समिती मध्ये त्या वेळेला प्रस्ताव दिला होता. आणि आपण सर्वांनी त्या विषयाला पाठींबा दिला. एकतर महानगरपालिकेकडुन जो आकृतीबंद आपण दिलेला आहे तो शासनाने मंजुर करावा. म्हणजे मुळ विषयाने त्याच ड्राफ्टींग पुर्ण होऊन जाईल. आकृतीबंद मंजुर होण्यात जर त्यांचे ट्रेस लागत असेल तर आपण त्याला येथे मी असा पत्र मांडला होता. तोपर्यंत आपण नगरपालिका मध्ये जी पदे मंजुर झालेली आहे. ज्याच्यापैकी रिक्त झालेल्या पदे भरण्याला आणि त्यामधुन अनुकंपाची भरती करणेस मान्यता द्यावी. तो प्रस्ताव आपण शासनाला पर्यायी म्हणुन दिलेला होता.आपल्या सर्वांच्या प्रयत्नामधुन शासनाने त्याला हिरवा झेंडा दाखविलेला आहे.नगरपालिका मधुन जी पदे मंजुर झालेली होती. त्याची खात्री करा की, ही सगळी पदे नगरपालिकेला शासनाने मंजुर केलेली आहे. आता त्याची तपासणी ते करतील. मागच्या आठवडयात आपण जी चर्चा केलेली आहे. त्याप्रमाणे अतिरिक्त आयुक्तांकडे मी पाठविलेले होते. ते अन्य कामाच्या बरोबर डायरेक्टर ऑफ म्युनिसिपल ॲडमिनिस्ट्रेशनच्या ऑफिसला जाऊन जे काही आपली पदे मंजुर झालेली आहे. त्यांचे आदेशाचे प्रती मिळविणेचे काम अतिरिक्त आयुक्त यांनी केलेले आहे. काही मिळालेले आहे काही मिळविण्याचे काम चालु आहे. आता एक बाजु झाली दुसरी शासनाच्या आदेशामध्ये जे म्हटलेले आहे, नगरविकास खात्याचे धोरणानुसार तुम्ही अंमलबजावणी करा. त्याच्यामध्ये जी आपण त्यावेळेला चर्चा केलेली होती. एकतर आपली संख्या निश्चित झाली. कोणती पदे आपण भरु शकतो हे निश्चित झाल्यानंतर त्याच्यामध्ये एक टप्पा आपला अजुन बाकी आहे. तो म्हणजे अनुशेषामध्ये कुठली पदे येतात.जे अनुशेषामधील पदे असतील आणि उमेदवारही कास्टचा असेल तर आपल्याला नियुक्ती करता येईल. परंतु रिझरवेशन एका समाजासाठी आहे, पद एका समाजासाठी आणि उमेदवार दुसरा असेल तर तसे करता येणार नाही. त्याच्यामुळे बॅकलॉकचा जो विषय आहे तो ते तपासुन बघतील. त्याच्या नंतर आपल्याला ते जोडया जोडविता येतील. पद एक जे आहे अमुक समाजासाठी अमुक समाज वर्गासाठी आहे. आणि त्याच उमेदवारने शैक्षणिक पात्रता धारण केलेली असेल. तर आपल्याला तेथे नियुक्ती देता येईल.हे करत असतांना ज्यांच्या जागा रिक्त झालेल्या आहे त्यांच्या जागेवर आपण नियुक्ती देणार.त्या नियुक्त्या विहित पध्दतीने झालेल्या आहे त्याची खातरजमा करुन घेणे गरजेचे आहे. याबाबतीत काही कामे पुर्ण झालेले आहे काही

कामे ते पुर्ण करुन घेतील. परंतु हे दोन मुद्दे की, त्यांचे नेमणुका विहित पध्दतीने झाल्या आहे की नाही, जे सेवे मधील मयत झालेले आपले जर काही असतील, आणि ही पदे आरक्षणाखाली कसे येतात. या दोन बाबींची तपासणी करुन आपल्याला हा विषय मार्गी लावायचा आहे.

**श्री.नितीन लढढा :-** छाननी तर याची ऑलरेडी झालेली आहे. त्या समजा मॅडम वेरीफाय करतील.जी आपण म्हणतात की, अनुशासनी पदे जी आहे. परंतु या सर्व गोष्टींना कुठेतरी कालमर्यादा निश्चित करावी लागेल. कारण काय होत ताई बघा असा आहे. आपल्याबाबतीत आता मी जी माहिती घेतली. आपण खुप कर्तव्यदक्ष आहात आणि खुप सकारात्मक विचाराने काम करतात. अशी माहिती मला त्या मुलांनीच दिली. आनंदाची गोष्ट आहे. परंतु मी तेच म्हटल ना, त्यांना अजुन कुठेतरी मदतीसाठी माणसे जोडुन देण्याच्या संदर्भातली भुमिका असेल की, मॅडम नविन असतील परंतु जो कोणी अनुभवी व्यक्ती आपल्या कार्यालयात सेवेमध्ये असतील. तशी अनुभवी मंडळी त्यांना जोडुन दिली तर या कर्मचाऱ्यांना लवकर न्याय मिळेल.कायद्यान्वये जितके लोकांना शक्य असेल तितक्यांना ही नेमणुक मिळाली पाहिजे. ही आमची आग्रहाची भुमिका आहे. कोणासही बेकायदेशीर नेमणुक द्या असा आमचा आग्रह नाही. पण कोणावर अन्याय होणार नाही याची मात्र कुठेतरी काळजी घेतली गेली पाहिजे. म्हणुन आपण याला साधारणता कुठेतरी कालमर्यादा निश्चित करावी. जेणे करुन त्यांना कुठेतरी दिलासा तरी मिळेल. ते अश्वस्त तरी होतील की, साधारणता १५ दिवसात हा विषय मार्गी लागु शकतो, २० दिवसात हा विषय मार्गी लागु शकतो.नाही तर असाच कुठल्यानी कुठल्या कारणाने प्रत्येक वेळेला याच्यावर विलंब होतो.

**मा.आयुक्त :-** आता दोन गोष्टी आहे. अतिरिक्त आयुक्त त्यांच्या आधारावर त्याची छाननी करतील. परंतु हे काम आणि याचे गांभिर्य, भविष्यात याच्या मध्ये काही ऑडिट वगैरे काही येऊ नये. अश्या दृष्टीने या कामासाठी जी पदे आहे ती शासनाने मंजुर केलेली आहे. त्यानंतर ते आरक्षणाखाली भरता येता किंवा नाही. जे कर्मचारी मयत झालेले आहे त्यांची नियुक्त्या विहित पध्दतीने झालेले होत्या किंवा नाही. या सगळयाची तपासणी करुन वन टु वन निर्णय घेण्यासाठी एक कमिटी आपण स्थापन करत आहे. त्या कमिटीचे अध्यक्ष अतिरिक्त आयुक्त असतील. त्या समितीमध्ये अंतरलेखा परिक्षक आणि मुख्य लेखाधिकारी हे तिघे असतील. तिघेही वरिष्ठ शासकीय अधिकारी आहे. त्यांना या कामाबद्दल एक चांगला अनुभव आहे. त्यामुळे यांच्याकडुन त्याची तपासणी होईल. गरजेप्रमाणे या समितीने जे काही तुम्हाला समितीने माहिती दिली आहे. आणि याच्यामध्ये जे काही आपण हे ६० प्रकरणे आहे त्याची तपासणी आपण लवकरात लवकर करु. याच्यामध्ये अनावश्यक विलंब होणार नाही हे बघु. परंतु या मागील विचार करणेसाठी माझी विनंती अशी राहिल नितीन भाऊ. कालमर्यादा निश्चित करण्यापुर्वी कामाचा आरोग्य एकदा तपासुन घेऊ द्या.आणि आपण त्याची कालमर्यादा ठेवुन घेऊ. फक्त काय होत कालमर्यादा म्हणजे आपण एखादी तारीख किंवा दिवस जाहिर केला. याच्या अनुकंपाचे जे उमेदवार आहेत ते आशा लावुन बसतात. काही कारणाने जर प्रशासनाचा विलंब झाला. विनाकारण त्यांची अपेक्षा भंग करतो आणि विनाकारण एक वेगळा मॅसेज जातो. असे व्हायला नको. फक्त एवढाच विषय आहे की, याच्यामध्ये अनावश्यक विलंब होणार नाही.याची आपण खातिरजमा करु. कारण बॅकलॅग बघणे हे अतिशय महत्वाचे आहे. त्याची प्रक्रिया आपण पुर्ण करु. आणि अतिशय प्राधान्याने समितीने विषय सगळे छाननी करावे आणि अहवाल सादर करावा. जे पात्र ठरतील त्यांना नियुक्ती देण्याची कार्यवाही होईल.

**श्री.नितीन लढढा :-** कालचाच विषय आहे. आपल्या अधिकाऱ्यांची पक्ष कार्यालयामध्ये बैठकीला जाण्याच्या संदर्भातल्या आज वृतपत्रात प्रसिध्द झालेल्या आहे. अधिकाऱ्याने कुठे जाव काय जाव हे प्रशासनाचा प्रश्न असला तरी, आपण प्रत्येक विभागामध्ये एक हालचाल रजिष्टर मेनटेन करतो. आणि त्याच्या मागचा हेतु हाच असतो की, जो कोणी अधिकारी असतील किंवा जो कोणी कर्मचारी असेल त्यानी त्याचे दालन सोडतांना त्या हालचाल रजिष्टर मध्ये त्याची नोंद करण्यात यावी. खालचा जर कर्मचारी असेल तर त्याने विभाग प्रमुखाची परवानगीने कार्यालय सोडायला पाहिजे. खातेप्रमुखांनी आयुक्तांच्या परवानगीने कार्यालय सोडायला पाहिजे. तर अश्या पध्दतीने हे जो कोणी अधिकारी जिथे कुठे मिटींगला गेलेले असतील.याच्या संदर्भातला यांचा हालचाल रजिष्टर जे आहे मागविण्यात यावे. आणि त्याची या सभागृहाला माहिती अवगत करुन द्यावी. असे पध्दतीने ते हालचाल रजिष्टर मेनटेन होतात की नाही. कारण काय होत. बऱ्याच वेळेला शासनाचा उद्देशच ते हालचाल रजिष्टर मेनटेन करण्याच्या बाबतीतली भुमिका अत्यंत स्पष्ट आहे की,

एखादा अधिकारी आपल्या कार्यालयात नसेल आणि कार्यालयात नसतांना कोणी पदाधिकाऱ्यांनी विचारणा केली किंवा आयुक्तांनी विचारणा केल्यानंतर एक ठराविक उत्तर त्याच्यामध्ये ठरलेला असतो की, अमुक साईट व्हिजीट करायला गेलो होतो. अमुक ठिकाणी भेट द्यायला गेलो होतो. आयुक्तांच्या दालनात गेलो होतो, पदाधिकाऱ्यांनी बोलविले होते म्हणुन तिकडे गेलो होतो. परंतु या सगळया गोष्टी टाळता यायला पाहिजे म्हणुन त्या हालचाल रजिष्टरची नोंद ठेवणे हे क्रमप्राप्त ठरविलेले आहे. अश्या पध्दतीने आपला स्वत:चे उत्तर याच्यामध्ये वाचले. मला उत्तरही थोडेसे खटकले, महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी पक्ष कार्यालयाच्या बैठकीत हजरी लावावी की नाही ? याबाबत तपासणी केली जाईल.तसेच या आदी देखील अश्या बैठकींसाठी तशी प्रक्रिया जर सुरु असेल. तर याबाबत देखील माहिती घेतली जाईल. एखादी प्रक्रिया किंवा एखादा विषय पुर्वी पासुन चालत आलेला असेल. तो योग्य असेल, आयोग्य असेल, चुकीचा असेल तो भाग वेगळा, परंतु कदाचित हे उत्तर मला आपल्याकडुन अपेक्षित नाही. या गोष्टी वस्तुस्थितीला धरुन आहे का ? नियमाला धरुन आहेत का ? कायद्याला धरुन आहेत का ? म्हणजे याच्या मागच कारण मी तुम्हाला सांगतो की, अश्या ज्या अनाधिकृत रित्या होणाऱ्या बैठकी, ज्या बैठकीमध्ये जे या सभागृहाचे सदस्य सुध्दा नाही. अश्या पध्दतीची मंडळीसुध्दा संबंधीत अधिकाऱ्यांवरती मोठया प्रमाणावर तोंडसुख घेतात. म्हणजे माझ्याकडे मागच्या मिटींगनंतर एक जबाबदार अधिकारी आला. त्या जबाबदार अधिकाऱ्यानी आपली खंत व्यक्त केली. अश्या पध्दतीने जे सभागृहातील पदाधिकारी नाही. सदस्य सुध्दा नाही ते. आणि अश्या पध्दतीने आम्हाला तेथे वेठीस धरले जाते. ज्या पध्दतीने बोलले जाते. त्यापेक्षा आम्ही व्ही.आर.एस.घेणे पसंत करु. या मनस्थिती पर्यंत अधिकाऱ्यांच्या मानसिकतेचे खच्चीकरण होत असेल. तर मला वाटत अत्यंत चुकीचा पायंडा कुठेतरी पाडला जात आहे.  आणि ही संपुर्ण जबाबदारी प्रशासनाची आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** भाऊ ऐका ना, आयुक्त साहेब.

**श्री.नितीन लढढा :-** कुलभुषण भाऊ माझे होऊ दे मग तु आर्धा तास बोल.

**श्री.कुलभुषण पाटील :-** ठिक आहे तुम्ही बोलुन घ्या.

**श्री.नितीन लढढा :-** अश्या पध्दतीने अधिकाऱ्यांचे मनोबल उंचावुन ठेवण्याचे काम आयुक्त म्हणुन ही आपली जबाबदारी आहे सर. अश्या पध्दतीने अधिकाऱ्यांचे मानसिक खच्चीकरण होत असेल.तर त्या सर्व गोष्टींचा परिणाम या शहरातील विकास कामांवरती म्हणा,त्याच्या कार्यपध्दतीमध्ये म्हणा, अश्या पध्दतीने वेगवेगळया ठिकाणी याचा प्रभाव पडतो. आणि कालांतराने कुठेतरी मानसिक खच्चीकरण झालेले अधिकारी हे आपल्या कामामध्ये जे योगदान देऊ शकतो.त्या पध्दतीचे योगदान मिळत नाही. ही अत्यंत गंभिर अशी बाब आहे. ती नियमाला धरुन असेल किंवा नियमाला धरुन नसेल मला त्याच्या बद्दलही बोलायचे नाही. परंतु मला सांगा. महापौर सत्ताधारी पक्षाचे आहे, स्थायी समिती सभापती हे सत्ताधारी पक्षाचे आहे. उपमहापौर सत्ताधारी पक्षाचे आहे. आपण याच्या दालनामध्ये ज्या काही शंका निरसन करायच्या असतील. तिथे अधिकाऱ्यांना पाचारण करु शकतात. त्यांच्याकडुन योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिली जाऊ शकते. योग्य ते दप्तर अवलोकन करायचे असले तरी ते या इमारतीमध्ये असतात तर असा कुठेतरी हा जो चुकीचा पायंडा पाडला जात आहे किंवा चुकीचा पायंडा पडत आहे. मला वाटत हे कुठेतरी योग्य दिसुन येत नाही. याची आपण मा. आयुक्त म्हणुन प्रशासनाच्या वतीने प्रशासनाचा मनोध्यर्य उंचावण्याच्या दृष्टीने आपण याची गंभितेने दखल घ्यावी ऐवढीच आपणास विनंती आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** हि अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना लावलेली सवय काही आजपासुन नाही. ही तत्कालीन टाईमापासुन आहे. ज्या वेळेस आपण सत्तेत होतात जेव्हा आपण महापौर होतात तेव्हा पासुन चालत आलेली आहे. फरक इतकाच आहे आज रोजी मिटींगा हे भाजप कार्यालयात होत आहे. तत्कालीन मिटींगा बंगल्यावर होत होत्या किंवा तुमच्या ऑफिसेस मध्ये होत होत्या.फरक इतकाच आहे. भाऊ आम्ही तर त्यांना कार्यालयापर्यंतच घेऊन गेलो ही त्यांच्यावर लावली गेलेली आणि लादली गेलेली सवय आहे. सभापती साहेब ऐका ना. हा जो विषय आहे. आज तर हे फक्त कार्यालयापर्यंतच पोहचले आहे परंतु तत्कालीन कर्मचारी अधिकारी हे जेल मध्ये सुध्दा जाऊन आलेले आहे. भाऊ काही विषयच नाही. हा जो विषय आहे. जो तो सत्ताधाऱ्यांनी ज्या त्या वेळेस लावुन दिलेला आणि कर्मचारी हे स्वईच्छेने जात नाही.ही त्यांनी लावली गेलेली सवय आहे. लादली गेलेली सवय आहे. आणि ते जे कर्मचारी आणि अधिकारी होते ते फक्त कार्यालयात याच्यासाठी आले होते. पक्षाची आमची त्याठिकाणी कुठलीच मिटींग नव्हती किंवा पक्षाचा त्याठिकाणी कुठलाही कार्यक्रमही नव्हता. पक्षाच्या मिटींगला किंवा कार्यक्रमाला ते अधिकारी आलेले नव्हते.

आमच्या थोडया काही अडचणी होत्या. त्या अडचणी विचारण्यासाठी आम्ही त्यांना बोलविलेले होते.फक्त इतकाच तो विषय होता. फार मोठा विषय नव्हता.

**श्री.नितीन लढढा :-** मा.कुलभुषण भाऊ, आपण मला सांगा,अडचणी निरसन करण्यासंदर्भात ज्या वेळेला मिटींगचा अजंडा तयार होतो. त्यावेळेला सर्व विषयांचा अजंडा तयार होतो. आणि जर अजंडयावरच्या विषयांबद्दलच विचारणा करायची असेल. मी म्हणतो महापौरांचे दालन आहे ना. तुम्ही तेथे अधिकाऱ्यांसोबत बैठक केल्यानंतर तेथे अधिकाऱ्यांसोबत चर्चा करणे संदर्भात कोणाला मज्जाव आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब, आमचे कर्मचाऱ्यांशी अधिकाऱ्यांशी नगरसेवक कर्मचारी अधिकारी या नात्या पलीकडे वेगळे संबंध आहे. आम्हाला ज्या अडचणी होत्या ते ऑफिशीयल टाईमात थोडी होत्या. ऑफिशीयल टाईमाव्यतिरिक्त होतात.

**श्री.नितीन लढढा :-** असे नाही, अधिकारी अधिकारी आहे, तो ऑफिशीयल टाईम असो किंवा ऑफिशीयल नसो. अधिकाऱ्यांना अश्या पध्दतीने कुठेना कुठे खाजगी याच्या मध्ये पाचरण करणे आणि एखादी सभा जशी चालली आहे त्या पध्दतीने त्या अधिकाऱ्यांची तेथे कान उघाडणी करणे किंवा त्यांचा अपमान करणे, सभासद आहे या सभागृहात अधिकार आहे सदस्यांना अधिकाऱ्यांना धारेवर धरण्याचा. परंतु जे या सभागृहाचे सदस्य नाही. ते पण तेथे बोलतात. याच्याने अधिकाऱ्यांचे मानसिक खच्चीकरण होऊन त्याचा परिणाम विकास कामांवरती पर्यायी याचा फटका जो आहे आपल्यालाच बसणार आहे. मी असे म्हणत नाही.तुम्ही सभापती आहात तुम्ही तुमच्या दालनात १० वेळा बोलवा ना.

**श्री.कुलभुषण पाटील :-** असे भाऊ जे सांगत आहे, असे कुठल्याच कर्मचाऱ्याला किंवा अधिकाऱ्याला सदस्य सोडुन सदस्यांचे नातेवाईक असतील दुसरे कोणी असतील.

**श्री.नितीन लढढा :-** आता प्रत्येकाचे नांव घेऊन पुरावे देणे योग्य वाटत नाही किंवा अधिकाऱ्यांचे नावे उघड करणे हे ही योग्य वाटत नाही.

**श्री.कुलभुषण पाटील :-** भाऊ तसे प्रकरण झालेच नाही. तुम्ही जे सांगत आहे हा तुमचा आरोप चुकीचा आहे खोटा आहे.

**श्री.नितीन लढढा :-** कुलभुषण भाऊ मी पोर्च मधुन वरती येतांना श्री.कैलास अप्पा भेटले आणि कैलास अप्पांनी या गोष्टीला दुजोरा दिला आणि मी नंतर बोललो ही आमच्या सदस्यांना अश्या पध्दतीने ज्यांना अधिकार नाही ते सुध्दा अधिकाऱ्यांशी अश्या पध्दतीने बोलतात हे चुकीच आहे.याची खात्री सुध्दा मला कैलास अप्पांनी पटविली. मला त्या गोष्टीत जायचे नाही. परंतु आयुक्त म्हणुन आपली ही जबाबदारी आहे. आपल्या अधिकाऱ्यांना आपण संरक्षण देणे आपली जबाबदारी आहे आणि अश्या पध्दतीने आपण काळजी घ्याल निश्चितपणे या बद्दलही वाद नाही. चांगल्याबाबतीत कौतुक करण्याच्या संदर्भात वाहुळे साहेबांचा एक अभिनंदनाचा प्रस्ताव मांडतो की, ज्या पध्दतीने आज कोरोनाच्या नविन शासनाच्या धोरणानुसार ज्या पध्दतीने जी तातडीने पाऊले उचलण्याच्या दृष्टीकोणातुन जिल्हा प्रशासन असेल महानगरपालिका प्रशासन असेल. ज्या पध्दतीने धडक कार्यवाही करत आहे.अत्यंत स्तुत अशी गोष्ट आहे आणि अश्या पध्दतीने जी मंगलकार्यालय सिल केली गेलेली असेल, जी काही प्रतिष्ठान सिल केली गेलेली असेल. मी निश्चित म्हणतो माझी या सभागृहाला सुध्दा विनंती राहिल की, अश्या पध्दतीने काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना कुठेतरी त्यांचे मानसिक मनोबल उंच व्हावे आणि जेणे करुन अश्या कार्यवाह्यांना वेळेत जर कधी आपण प्रोत्साहन दिले. तर या पुढच्या भविष्यात जी लॉकडाऊन पर्यंत जाणारी परिस्थिती आहे. त्या टाळता येणे शक्य आहे. म्हणुन मी मनापासुन वाहुळे साहेबांचे अभिनंदन करतो. अनेक वेळा मी सुध्दा त्यांना फोन करतो , परंतु ज्या वेळेला ते पटवतात की, कारण काय असत, लोकप्रतिनिधी म्हणुन स्थानिक जनता आम्हाला फोन करते आणि स्थानिक जनता फोन करत असतांना ती म्हणते की, विनाकारण वाहुळे साहेब त्रास देत आहे. विनाकारण आमच्या दुकानांना सिल लावण्यात आलेले आहे. ज्या वेळेला आपण प्रशासनाकडुन त्याची खात्री पटवुन घेतो आणि ज्या वेळेला ते खात्री पटवुन सांगतात की, आपण यांचे व्हिडीओ शुटींग पाहुन घ्यावे की, यांच्या दुकानामधील परिस्थिती काय होती. त्या सगळया गोष्टींची खात्री पटल्यानंतर आपण ही त्यांना सांगतो की, ठिक आहे आपण जी कार्यवाही करता आहे ती नियमानुसार करत आहात आणि योग्य पध्दतीने करत आहे. कारण काय आहे, ही परिस्थिती आपण गेल्या ८-९ महिन्यापासुन अनुभवलेली आहे. आणि अशेच जर याला वेळेत आटोक्यात न ठेवता पुढे लॉकडाऊन पर्यंतचे जे परिणाम होतील. ते या महानगरपालिकेला काय ? या राज्याला काय ? या देशाला काय ? न परवडणारे विषय आहे. अश्या अधिकाऱ्यांचे मनोबल उंचावण्याच्या दृष्टीकोणातुन त्यांना सहकार्य करणे या सभागृहाची जबाबदारी आहे आणि चांगल्या कामाबद्दल त्यांचे

अभिनंदन करणे सुध्दा आपल्या कर्तव्याचा भाग आहे. जेणे करुन त्यांना योग्य पध्दतीने त्यांना सुध्दा मनामध्ये एक विश्वास होईल की, मी एकटा नाही संपुर्ण सभागृह माझ्या पाठीशी आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय, मी आपल्याला २ फेब्रुवारीला एक पत्र दिलेले आहे. कर्मचाऱ्यांच्या रोखण्यात आलेल्या वेतनवाढ बाबत, मागच्या मिटींगला तुम्ही साहेबांना सांगितले होते. साहेब आपल्या महापालिकेत कार्यरत असलेल्या काही कर्मचाऱ्यांच्या चौकश्या चालु होत्या. त्यांच्या चौकश्या चालु असतांना त्यांची वेतनवाढ ही रोखण्यात आलेली होती. आयुक्त साहेब, आपल्यासोबत सर्व सभागृहाला विनंती आहे की, ज्या कर्मचाऱ्यांच्या चौकश्या पुर्ण झालेल्या असतील. मी मागच्या मिटींगमध्ये पण हा विषय बोललो होतो. जे दोषी नसतील त्यांची वेतनवाढ ही पुर्ववत करावी. जेणे करुन त्यांच्या कामात त्यांना उत्साह येईल. त्यांची वेतनवाढ बऱ्याच दिवसापासुन थांबलेली आहे. आणि ती वेतनवाढ पुर्ववत करावी. जे दोषी नसतील त्यांचे, जे दोषी असतील त्यांची हरकत नाही. ज्यांच्या चौकश्या झाल्या असतील त्यांच्या वेतनवाढ पुर्ववत करावी ही विनंती.

**श्री.नितीन लढढा :-** फक्त त्याचे आलेल्या अर्जांना आपण स्विकार करावा, त्याच्यावरती अधिकार पुर्णता आपले आहे. योग्य असेल तर द्यायला हरकत नाही, अयोग्य असेल तर ना मंजुर करायला हरकत नाही. परंतु कोणी पुटअप केल्यानंतर त्याला निलंबीत करण्यापर्यंत ती जी भुमिका आहे ती थोडीशी मला वाटत अवास्तव आहे.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** साहेब माझ्या वार्डामध्ये ऑक्सीजन पार्क नाही.

**मा.आयुक्त :-** हा जो कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढी संदर्भातला विषय आहे. प्रत्येक केस आपण त्यांची मेरीटवर तपासु. आणि नियमांच्या बाहेर काहीही चुकीचे होणार नाही. आणि त्यांच्यावर काही अन्याय होणार नाही. मात्र जे दोषी असतील त्यांना शासन बघेल. असे निर्णय आपण घेऊ. परंतु एक या निमित्ताने सर्व सन्मा.सदस्यांना मला एक विनंती करायची आहे की, कर्मचाऱ्याच्यावरती शिस्तभंगाची कार्यवाही करणे ही नियमाने घालुन दिलेली प्रक्रिया आहे. याच्या मध्ये त्या संबंधीत कर्मचाऱ्याने शिस्तभंग केला असेल, सुट्टी असेल, त्याला नोटीस दिली जाते, त्याचे म्हणणे ऐकुन घेतले जाते. आणि त्यानी केलेल्या शिस्तभंगाच्या प्रमाणामध्ये जी काही योग्य असेल. ती शिस्त अभियंतांचे स्तरावर दिली जाते. आता प्रशासकीय भाषेमध्ये कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करणे, अर्ज निहाय कार्यवाही म्हणतो. Constitution म्हणतो. म्हणजे त्याला एक कायद्याचे स्वरुप आहे. त्याला एक न्यायालयीन कामकाजाचे स्वरुप आहे. एकदा एखाद्या कर्मचाऱ्याला आयुक्तांच्या स्तरावर शासन दिल्यानंतर पुन्हा त्याला ठराविक गोष्टी बद्दल आयुक्तांनी दिलेल्या शिक्षाविरुध्द स्थायी समितीला अपिल करता येते. आता स्थायी समितीने घेतलेला निर्णय जो आहे. तो जर कर्मचाऱ्याला मान्य झाला तर ठिक, प्रशासनाला जर असा वाटल की, कर्मचाऱ्यानी चुक केल्यानंतर सुध्दा स्थायी समितीने माफी द्यायची भुमिका घेतलेली आहे. चुकीचा मॅसेज जाईल. तर काही प्रमाणामध्ये हे ठराव ४५१ खाली शासनाकडे पाठविले जातात. मग शासन त्या कर्मचाऱ्याची चुक आहे की नाही. आणि स्थायी समितीने दिलेला निर्णय हा न्याय देणेनुसार आहे किंवा नाही हे बघतो आणि गरजे प्रमाणे असे ठराव विखंडीत जाते. याच्यानंतर स्थायी समितीचा निर्णय जर त्याला मान्य नसेल तर स्थायी समितीवरची ॲफिलीएटेड अथॉरिटी ही महासभा, महासभेसमोर आपण दाद मागतो. महासभेचा ही निर्णय मान्य नसेल तर न्यायालयतर प्रत्येक बाबीत आहे ते न्यायालयात जाते. ही जी प्रक्रिया आहे ही प्रक्रियेचा अवलंब न करता, असे पदे आपल्याकडे दिसते की, पुन्हा तिथेच अर्ज करायचा, माझ्यावर अन्याय झाला मला कामावर घ्या, एक अर्ज नाकारला, दुसऱ्याने अर्ज करायचा, प्रत्येक वेळा कोणी ना कोणी पदाधिकारीकडे, अश्या पध्दतीने एकच अर्ज त्या ठिकाणी चारदा त्याच ठिकाणी जातो. आणि अश्यामध्ये कर्मचारी वेठीस धरले जातात. आता कालच माझ्याकडे एका कर्मचाऱ्याची, त्याला रिटायर होण्या अगोदर त्याची चौकशी सुरु झाली. शिस्तभंग आढळला, आणि त्याची कार्यवाही चालु आहे, अश्या परिस्थिती मध्ये रिटायर झालेले तत्कालीन आयुक्तांनी २०१७ मध्ये १०% पेन्शन कपात करण्याचा निर्णय दिला, त्यानी स्थायी समितीमध्ये अपील केले, स्थायी समितीने ती १०% पेन्शन रद्द करण्याचा निर्णय घेतला, आयुक्तांनी शासनाला पाठविला, शासनाकडुन त्याला विलंब ही झाला, आता ही प्रक्रिया झाल्यानंतर त्याने महापालिकास्तरावर नव्याने अर्ज दिला. पुर्नविलोकन करण्याची कायद्यात तरतुद नाही. तरी त्यानी २०१८ मध्ये अर्ज केलेला, तरी आयुक्तांनी नामंजुर केला, नाही करता येणार, पुन्हा एक अर्ज दिला, आणि पदाधिकारी मग याच्यामागे लागतात, आमची चर्चा झालेली आहे, तुम्ही प्रस्ताव ठेवा आणि प्रस्ताव चुकीचा का ठेवला काल मी त्या कर्मचाऱ्यांना थोडुसी कडक भाषा मध्ये

बोललो, तर तुम्हाला सांगितल तर आश्चर्य वाटेल, सिनियर कर्मचारी आहे, उपायुक्त प्रशांत पाटील ही तेथे त्यावेळेला, ते कर्मचारी माझ्यासमोर रडत होते, जर आपण मला म्हणत आहात बरोबर आहे, आपण आम्हाला संरक्षण देत आहे. विचित्र येथे परिस्थिती आहे, एवढा दबाव येतो अश्या कर्मचाऱ्यांकडुन कोणाला तरी घेऊन येतात, तु प्रस्ताव ठेव, मी चुकीचा प्रस्ताव ठेवल्या अगोदर मी बरोबर ठेवला होता, एवढा दबाव येतो, तुला काय करायच, मी सांगतो तेवढ लिहा, आता अश्या प्रकारचे आपण सुध्दा वातावरण निर्माण करणे योग्य नाही. जसे नितीन भाऊ तुम्ही म्हणालात, आयुक्त म्हणुन सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना जे योग्य असेल त्यांना प्रशासनाचा पुर्ण संरक्षण राहिल. त्यांच्या पाठीशी आपण निश्चित राहणार आहोत. परंतु अशी चुकीची पध्दत पडणार नाही याची खबरदारी मनपाच्या पदांवर बसलेले पदाधिकारी हे सुध्दा घ्या. चुकीच्या कामासाठी आपणच आपल्या कर्मचाऱ्यावर दबाव आणणे. आणि त्याच्यावर दबाव आणुन त्यांचे मनोबल खच्चीकरण करणे, हे कुठल्याही पध्दतीने योग्य नाही, योग्य असेल, कर्मचारी काम करत नसेल तुम्ही समान मार्गदर्शन काढा, आपण त्याच्याकडुन काम करुन घेऊ. परंतु चुकीच्या कामासाठी दबावही येणार नाही किंवा कायद्याच्या बाहेर जाऊन कुठलीतरी प्रक्रिया राबविण्याचे आपण आग्रह करणार नाही ते सुध्दा आपण पदाधिकाऱ्यांनी बघितले पाहिजे.

**सौ.प्रतिभा देशमुख :-** साहेब, ऑक्सीजन पार्कची मागणी आहे आणि तेथे माळी आणि वाचमन पाहिजे. दोन वर्षापासुन माझे मिस्टर मागणी करत आहे.

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** मागे दिलेले होते,

**सौ.प्रतिभा देशमुख :-** नाही ना तो संपला साहेब, आता दोन वर्ष झाले त्याला. नाही ना साहेब तुम्ही स्पेशल येऊन बघा.

**मा.आयुक्त :-** ऑक्सीजन पार्क उभारणे त्याच्यासाठी आपण आरोग्य योजनेमध्ये त्याची आयुष्य ठरवुन दिलेली आहे. त्याच्या मेनटेनन्ससाठी आपल्याला कायमस्वरुपी धोरण राबविण्यासाठी शासनाला आपण फाईल पाठविलेली आहे . ज्या ठिकाणी महानगरपालिकेचे कर्मचारी कमी असतील. त्याचा रेषो काढायचा आणि असे करून तुम्ही ते ठरवा.

**श्री.अरविंद भोसले, शहर अभियंता :-** प्रस्ताव तयार करून पाठवतो सर.

**मा.आयुक्त :-** लवकर करा तुम्ही आणि फक्त ऑक्सीजन पार्क नाही, हरीत क्षेत्र असतील, काही इतर बगीचे असतील जे आपण स्वत: मेनटेन करत आहे. अश्या ठिकाणी आपण मदत घेतली पाहिजे, तुम्ही इस्टीमेट करा आणि वार्षिक रेट तत्वावर ते द्या.

**मा.सभापती :-** भोसले साहेब, मला वाटत, हा जो बगिचा आहे त्याचे ८ ते १० महिन्यापुर्वीच लोकार्पण झालेले आहे. आणि तेथे खुप चांगली वृक्ष लावलेली आहेत. आणि कदाचित तेथे नागरीकांना आनंद ही होतो परंतु तेथे आपण चौकीदार नाही ठेवले संरक्षणासाठी तर आपण हा केलेला खर्च वाया जाईल. तर त्याची लवकरात लवकर तरतुद करण्यात यावी.

**मा.आयुक्त :-** आता हा विषय निघाला, बहुतांश सदस्यांनी भावना व्यक्त केल्या, आपण बागे निर्माण करतो किंवा वृक्ष लागवड करतो, रोड डिव्हायडर मध्ये आपण झाडी लावतो. नंतर त्याचे मेनटेनन्स होत नाही. आता आपण मालमत्ता करामध्ये जे वृक्षकर घेतो तो याच कामांसाठी आहे. हे शिल्लक होतो, हा बजेट मध्ये ज्या वेळेला आपण अभ्यास कराल त्यावेळेला लक्षात येईल की, वृक्ष प्राधिकरणाचे आम्ही एक वेगळे बजेट तयार केलेले आहे. वृक्षकराखाली जमा होणारे उत्पन्न हे अन्य कारणासाठी न वापरता, फक्त वृक्ष लागवड, वृक्ष जोपासणे आणि वृक्ष संगोपन याच्यासाठीच केले जाईल. कमी पडणारा निधी हा महानगरपालिका बजेट मधुन दिला जाईल. अश्या पध्दतीचे बजेट मध्ये आम्ही दिलेले आहे. आपली मान्यता दिल्यानंतर पुढील वर्षापासुन वृक्षकराने मिळणारा आपल्याला जे ही १.५ ते २ कोटीचे उत्पन्न आहे हे आपल्याला पुर्ण या कारणासाठी वापरावा. मला खात्री आहे. हरीत क्षेत्र असतील, ऑक्सीजन पार्क असतील किंवा वेगळे काही मुद्दे असेल. खाजगी कंपनीची मदत घेऊन आपण चांगल्यापध्दतीने मेनटेन करु शकतो. कारण वृक्ष हे नागरीक लावतात अणि वृक्षांच्या बाबतीत आपण तितके हे राहत नाही. वृक्ष प्राधिकरणाच्या समितीवर नितीन भाऊ आपण ही आहात. आपले बरेच सदस्य आहेत. आपण पुढच्या वर्षामध्ये हा जो वृक्ष प्राधिकरणाच्या निधी मधुन जो सेपरेट बजेट ठेवलेले आहे याचे आपण वृक्ष प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये त्याचे नियोजन करु. झाडे लावण्यापासुन त्यांचे संगोपन करणेपर्यंत संपुर्ण चांगल्यापध्दतीने होईल. आणि शहर खरोखर हरीत होईल. वृतपत्रातुन वाचले की, आपल्याकडे प्रदुषणाचे प्रमाण वाढलेले आहे. राज्यामधील १७ प्रदुषीत

शहरांमध्ये आपण एक आहोत. हे जे आपल्याला आलेला नामुषकीने आहे ते दुर करण्यासाठी आपल्या या निधीचा चांगल्या पध्दतीने वापर करुन जळगांव शहराचा वातावरण आपल्याला बदल करता येईल.

**श्री.प्रशांत नाईक :-** आपल्याला ODF++ दर्जा मिळालेला आहे. प्रशासनाचे अभिनंदन आहे. पण माझ्या प्रभागात साहेब सार्वजनिक शौचालयाची दोन महिने झाले बोरिंग बंद आहे. मी बाबा साळुंखेंना १० वेळा फोन केले, ते बोरिंग काढुन घेऊन गेले दोन वेळा, बंद झाली अजुन चालु होत नाही. तुम्ही येऊन पहा साहेब, एवढी घाण झालेली आहे तेथे की, लोकांना बसायला जागा नाही. बाहेर बसायला लागुन गेलेले आहे लोकं, तेथील बोरिंग काढुन घेऊन गेलेले आहे.

**श्री.नितीन लढढा :-** म्हणजे मुळे उद्दिष्टच आपला निष्फळ होत ना.

**श्री.सुशिल साळुंखे :-** प्रक्रिया पुर्ण होऊन कार्यादेश दिला गेलेला आहे. या पुढे सार्वजनिक शौचालयांमध्ये अशी अडचण येऊ नये म्हणुन पुढच्या वर्षी आपण १४ व्या वित्तीय आयोगामधुन दुरुस्तीसाठीचे टेन्डरच प्रसिध्द करीत आहोत. म्हणजे हा प्रश्न निर्माण होणार नाही.

**मा.सभापती :-** त्याच्यासाठी आपण आता काय व्यवस्था करु शकतो. समजा आता ती बोरींग बंद पडली. टँकरच्या माध्यमातुन किंवा आपल्या गाडयांच्या माध्यमातुन पाणी पुरवु शकत नाही का ?

**श्री.सुशिल साळुंखे :-** टँकर तर आहे आपल्याकडे पण तेथे काही ठिकाणी टँकर जायला रस्ता नाही. हरिविठ्ठल नगर आहे, खंडेराव नगर आहे त्या पर्यंत रोड नाही.

**श्री.प्रशांत नाईक :-** आपल्याकडे जायला जागा आहे तेथे.

**मा.सभापती :-** मग का नाही केले तुम्ही.

**श्री.सुशिल साळुंखे :-** आरोग्य विभागाचे टँकर आरोग्य विभागाला दिलेले आहे ना त्यांनी.

**मा.आयुक्त :-** ज्या ठिकाणी बोरिंगची अडचण येत आहे त्या ठिकाणी आपल्या कर्मचाऱ्यांमार्फत व्यवस्था करा. परंतु सार्वजनिक शौचालयांची देखभाल दुरुस्ती हा नेहमी सदस्यांकडुन येणारा प्रश्न असतो. याच्यासाठी आपण काय करतो प्रत्येक वेळेला गरजे प्रमाणे त्याचा टेन्डर इस्टीमेट करायच. तसे न करता आपण पुढच्या वर्षी जसे आपण पाणी पुरवठेच्या पाईप लाईन मेनटेनन्सचे एकच टेन्डर काढुन वार्षिक तत्वावर देतो किंवा स्टेशनरी छपाई. तसेच आपले सार्वजनिक शौचालय देखभाल दुरुस्ती, त्याच विधस्मीकरण आणि बोरवेल या सगळयांचे एकत्रीत टेन्डर काढुन आपण वर्षभरासाठी त्यांचे टेन्डर देऊ. म्हणजे ज्या दिवशी गरज राहील त्याच दिवशी आपल्याला त्याची दुरुस्ती करता येईल. आता हे जे टेन्डर काढणे, एजन्सी नेमणे, कार्यादेश देणे याच्यामध्ये वेळ जातो. तो वेळ जाणार नाही. त्याची लवकरात लवकर दुरुस्ती करता येईल.

**श्री.प्रशांत नाईक :-** आता ही बोरींग केव्हा सुरु होईल. दोन महिने झाले काढुन घेऊन गेलेले आहे.

**मा.आयुक्त :-** लवकर बघुन घ्या.

**श्री.नितीन बरडे :-** कोविडचे पेशन्ट येत आहे १५० ते २०० रोज. आपण टेस्टींग काय करतो आहे सद्या.

**मा.आयुक्त :-** आता आपण साधारणता कालची जर आकडेवारी बघितली १६४ पॉझिटीव्ह आहे. आपण सध्याच्या धोरणाप्रमाणे ॲन्टीजेन पध्दतीने करत आहोत.

**श्री.नितीन बरडे :-** ॲन्टीजेन चालु आहे का साहेब?

**मा.आयुक्त :-** ॲन्टीजेन चालु आहे आणि त्याचा प्रमाण वाढविण्याचा निर्णय ही जिल्हाधिकारी यांनी घेतलेला आहे. आणि ज्या कुठल्याही प्रकारचे लक्षणे नाही. आणि हायरिस्क मध्ये नाही. किंवा ते हायरिस्क मध्ये आहे. म्हणजे ज्या कुटुंबा मधील व्यक्ती पॉझिटीव्ह आली. बाकीच्या कुटुंबाला नाही दिसुन येतो, तर अश्या व्यक्तींना आपल्याला १००% आर.टी.पी.सी.आर. करावी लागेल. ज्यांना लक्षणे नसते आणि कमी धोका असलेल्या त्यांच्या बाबतीत आपल्या ॲन्टीजेन करावे लागते.

**श्री.नितीन बरडे :-** सर, ॲन्टीजेन वाढुन घ्या कारण की काय आहे. तो पर्यंत तो व्यक्ती गावात फिरत राहतो. तो बॉम्बगोळा गावातच फिरत राहतो. तो प्रसाद देत राहतो सर्वांना

**मा.आयुक्त :-** म्हणुन ॲन्टीजेन वाढविण्याचा निर्णय जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठकीत घेतलेला आहे. त्यांनी ज्या सुचना दिलेल्या आहे ते आपण करतो आहे. कुठेही त्यात टेस्टींग चुकविणार नाही. एवढया अवेअर ठेवलेल्या आहे आपण झोन.

**श्री.नितीन लढढा :-** ही जी दोन वाजेपर्यंतची बंधन आहे ना. तर संध्याकाळच्या सेशन मध्येही ॲन्टीजेन टेस्ट करण्याची सुविधा उपलब्ध करुन ठेवायला पाहिजे.

याच्यानंतर स्वॅबचे ठिकाणे ही वाढु आणि टाईमींग ही वाढु. आपल्याला टेस्ट वाढविणे हेच आपले उद्दिष्ट आहे. ज्या ज्या पध्दतीने टेस्ट वाढविता येईल ती सर्व उपाययोजना आपण करु.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३२० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र./सा.बा./१०० दि.२५/०१/२०२१ अन्वये प्रभाग क्र.०८ निमखेडी शिवार गट नं.९५ १ अ ते १ डी मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.नितीश कैलास कापडणे यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर २.९०% जास्तचे दर स्विकारुन रक्कम रु.५,८८,१४४/- मात्र खर्चाची संविदा.

२. प्रशासकीय आदेश क्र./सा.बा./१०२ दि.०२/०२/२०२१ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.१५ मधील महानगरपालिका मालकीच्या सि.टि.एस.नं.६७ या जागेत सामाजिक सभागृह बांधणे कामी मक्तेदार रिंकु यु. चौधरी यांचे निविदा रक्कमेपेक्षा ९.९९% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१३,२६,२९८/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

३. प्रशासकीय आदेश क्र./सा.बा./१०९ दि.०५/०२/२०२१ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील वार्ड क्र.१३ मध्ये स.नं.४५४ राकेश नगर ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे व वार्ड क्रमांक १३ मधील नुतनवर्षा कॉलनी मधील स.नं.४४५/२ब ओपनस्पेसला चेनलिंग फेन्सींग करणे कामी मक्तेदार विलास पी पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा ९.९९% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१६,५१,९२५/- मात्र खर्चाची संविदा.

४. प्रशासकीय आदेश क्र./सा.बा./११० दि.०५/०२/२०२१ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या ५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्र.क्र.१८ मेहरुण स.नं.१७/४ मधील खुल्या जागेस कुंपणभिंत बांधणे कामी मक्तेदार स्वप्नील नरेंद्र चौधरी यांचे निविदा रक्कमेपेक्षा ७.२०% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१२,९३,२९४/- मात्र खर्चाची संविदा.

उपरोक्त संविधा मधिल जी कामे मुदतीत केलेली नसतील अथवा ज्या कामांना सुरुवात केलेली नसेल तर अश्या मक्तेदारांना प्रशासनाने नोटीस देवून मक्ता रद्द करण्याबाबत कार्यवाही करावी व नविन निविदा प्रक्रिया तात्काळ राबविण्यात यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १२ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करतो की सर्वांनी राष्ट्रगीत साठी उभे राहायचे आहे.

राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**